RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष २, अंक १६(२)] शनिवार, फेब्रुवारी ६, २०१६/माघ १७, शके १९३७ [पृष्ठे ४०, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**नगरविकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ फेब्रुवारी २०१६

**अधिसूचना**

**अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६.**

क्रमांक अमपा. २०१२/प्र.क्र.३०१(भाग-२)/नवि-२५.—अहमदनगर महानगरपालिकेमध्ये अंमलात असलेले सध्याचे सर्व सेवा प्रवेश नियम तसेच तत्संबंधात यापूर्वी करण्यात आलेले ठराव व आदेश यांचे अधिक्रमण करुन अहमदनगर महानगरपालिका याद्वारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५७ (३) अंतर्गत महानगरपालिकेमधील विविध पदांवर करावयाच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :—

**नियम**

१. **संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती :**

(१) या नियमांना " अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६ " असे संबोधण्यात येईल.

(२) हे नियम अंतिमरित्या **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

(३) हे नियम अहमदनगर महानगरपालिकेमधील सर्व पदांवरील नियुक्त्यांना लागू होतील ; मात्र, अन्यथा नमूद केले नसल्यास अंशकालिक स्वरुपाच्या नियुक्त्या, कंत्राटी पद्धतीने किंवा रोजंदारी तत्त्वावरील नियुक्त्या तसेच, मानसेवी स्वरुपाच्या नियुक्त्यांना लागू होणार नाहीत.

२. **(अ) व्याख्या :**

विषय किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास या नियमांसाठी,—

(१) " अधिनियम " म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा मुंबई ५९).

(२) " परिशिष्ट " म्हणजे या नियमांना जोडलेली परिशिष्टे.

(३) " नियुक्ती प्राधिकारी " म्हणजे अधिनियमाच्या कलम ५३ च्या पोट-कलम (१) ते (३) च्या तरतुदीप्रमाणे नियुक्ती देण्यास सक्षम असलेला अधिकारी.

(४) " संवर्ग " म्हणजे एखाद्या सेवेतील किंवा एखाद्या सेवेच्या भागातील स्वतंत्र घटक म्हणून मंजूर केलेल्या कायम त्याचप्रमाणे हंगामी शासनमान्य पदांचा समूह.

(५) " कर्मचारी " म्हणजे या नियमांच्या परिशिष्टात नमूद केलेले महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी.

(६) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन.

(७) " एकीकृत संवर्ग " म्हणजे विविध पदांच्या कर्तव्याचे स्वरुप ती पदे धारण करण्यासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वेतनश्रेणी यांचा सारासार विचार करुन सेवा नियमासाठी एकीकृत केलेला संवर्ग.

(८) " महानगरपालिका " म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी अन्वये निर्माण केलेली अहमदनगर महानगरपालिका.

(९) " अर्हताप्राप्त कर्मचारी " म्हणजे नियमाच्या परिशिष्ट-२ मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणारे कर्मचारी. या नियमांत वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द किंवा शब्द समुहांचा अर्थ अधिनियमात दिल्यानुसार असेल.

२. **(ब) सेवांचे वर्गीकरण (Classification of Services)**

(१) **प्रशासकीय सेवा.—** सामान्य प्रशासन, प्रभाग प्रशासन, महसूल व महानगरपालिका सचिवालय अंतर्गत असलेल्या विभागातील सेवा या प्रशासकीय सेवा संबोधण्यात येतील.

(२) **लेखा सेवा.—** महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवस्थापनाशी संबंधित (अर्थसंकल्प, लेखा लेखापरिक्षण, लेखा आक्षेप निराकरण व खर्च व्यवस्थापन इ.) सेवा या लेखा सेवा संबोधण्यात येतील.

(३) **तांत्रिक संवर्ग आणि तांत्रिक सेवा.—** ज्या पदावरील नियुक्तीसाठी सांविधिक विद्यापीठ / अभिमत विद्यापीठ / राज्य तंत्रशिक्षण मंडळ (Board of Technical Education) वा केंद्रीय तंत्रशिक्षण मंडळ (Board of Central Technical Education) तंत्रशिक्षण परिषद (Technical Council) यांच्यामार्फत चालविले जाणारे विविध तांत्रिक व अभियांत्रिक व अभियांत्रिकी विषयक अभ्यासक्रम अशी किमान शैक्षणिक अर्हता विहित केली असेल, अशा पदांना तांत्रिक संवर्ग संबोधण्यात येईल व अशा पदांची सेवा तांत्रिक सेवा संबोधली जाईल.

(४) **वैद्यकीय संवर्ग आणि वैद्यकीय सेवा.—** ज्या पदावरील नियुक्तीसाठी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वैद्यकीय शास्त्राचा पदवीधारक, पदव्युत्तर पदवीधारक / पदविका तसेच मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया, आयुष व तत्सम आयुर्वेदिक कौन्सिल, युनानी, होमोओपॅथिक कौन्सिल यांच्याकडील नोंदणी ही किमान शैक्षणिक अर्हता विहित केली असेल, अशा पदांना वैद्यकीय संवर्ग संबोधण्यात येईल व अशा पदांची सेवा वैद्यकीय सेवा संबोधली जाईल.

(५) **निमवैद्यकीय संवर्ग आणि निमवैद्यकीय सेवा.—** वैद्यकीय सेवेतील पदांना सहाय्यकारी असणाऱ्या पदांच्या संवर्गाला, उदा. परिचारिका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्ष-किरण तंत्रज्ञ, रक्तपेढी तंत्रज्ञ, भौतिक उपचार तज्ज्ञ, व्यवसायपचार तंत्रज्ञ,वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, दंत आरोग्य तज्ज्ञ, मिश्रक व औषध निर्माता इ. निमवैद्यकीय संवर्ग व अशा पदांच्या सेवेला निमवैद्यकीय सेवा संबोधण्यात येईल.

(६) **अग्निशमन सेवा.—** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सुरक्षा उपाययोजना अधिनियम, २००७ मध्ये समाविष्ट असलेल्या अग्निशमन सेवा.

३. **नेमणुकीची पद्धत व अर्हता :**

(१) महानगरपालिकेतील विविध पदांवर नियुक्तीची कार्यपद्धती परिशिष्ट-१ मध्ये विहित केल्यानुसार व शिक्षण अनुभव इ. आवश्यक अर्हता परिशिष्ट-२ मध्ये विहित केल्याप्रमाणे असतील. नियुक्तीची पद्धत अधिनियमाच्या कलम ५४ व अनुसूची ड मधील प्रकरण ३ नुसार असेल.

(२) **भारतीय नागरिकत्व आणि महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र.—**उमेदवार भारताचा नागरिक असावा आणि महाराष्ट्रात १५ वर्ष अधिवास (Domicile) करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्रात जन्म झाल्याबाबत जन्म दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

(३) **संगणक हाताळणी / वापराबाबतच्या ज्ञानाची आवश्यकता.—**परिशिष्ट-२ मध्ये विहित केलेल्या अर्हतेव्यतिरिक्त वाहनचालक आणि श्रेणी-४ ची पदे वगळून इतर सर्व पदावरील नेमणुकीसाठी / पदोन्नतीसाठी शासन वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल असे संगणक हाताळणे / वापराबाबतचे ज्ञान, एक अतिरिक्त आवश्यक अर्हता असेल.

(४) **वयोमर्यादा.—**महानगरपालिकेतील कोणत्याही पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी किमान वयाची अट १८ वर्ष पूर्ण व कमाल वयोमर्यादा परिशिष्ट-२ मध्ये संबंधित पदासमोर नमूद केल्यानुसार असेल, कमाल वयोमर्यादा विहित केली नसेल अशा पदांच्या बाबत ती प्रचलित शासन धोरणाप्रमाणे असेल. सामाजिक आरक्षण लागू असणाऱ्या प्रवर्गाकरिता प्रचलित शासन निर्णयानुसार वयोमर्यादा शिथिलक्षम असेल.

(५) **पदोन्नती व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण.—**(क) नामनिर्देशन वा पदोन्नतीचे प्रमाण परिशिष्ट-२ मध्ये संबंधित पदासमोर दर्शविल्यानुसार असेल. तथापि, ज्या पदासमोर असे प्रमाण विहित केलेले नसेल अशा पदावरील नियुक्तीसाठी पदोन्नती व नामनिर्देशनाचे प्रमाण ५०:५० असे राहील.

(ख) एकाकी पद सामान्यतः पदोन्नतीने भरण्यात येईल. तथापि विशिष्ट अर्हता आवश्यक असलेल्या एकाकी पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध नसल्यास तसे पद प्रतिनियुक्ती किंवा नामनिर्देशनाने भरता येईल.

४. **पदोन्नतीने नेमणूक करणे.—** पदोन्नतीने करावयाची कोणतीही नियुक्ती, ज्येष्ठता नि-पात्रता या तत्त्वावर, अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांमधून केली जाईल.

५. **प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक.—** या नियमांमध्ये विहित केलेल्या अर्हतेनुसार ज्या पदांवर प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक करण्याची तरतूद आहे, अशी पदे केंद्र शासन, राज्य शासन, इतर स्थानिक स्वराज्य संस्था व स्थानिक प्राधिकरणातील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरता येतील.

६. **अन्य महानगरपालिकेतून अहमदनगर महानगरपालिकेत बदलीने नियुक्ती.—** या नियमात अन्यत्र काहीही नमूद केले असले तरी, अन्य महानगरपालिकेतील कर्मचाऱ्याने एखाद्या महानगरपालिकेतील पदावर बदलीने नियुक्तीसाठी अर्ज सादर केल्यास, अधिनियमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालिकांतील नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील, अशा अटी व शर्तीवर, खालील बाबींच्या अधीन राहून बदलीने नियुक्ती देता येईल.

(अ) पदोन्नतीने भरण्यात येणाऱ्या पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही. फक्त नामनिर्देशनाने नियुक्तीकरिता राखून ठेवण्यात आलेल्या रिक्त पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

(ब) अशी नियुक्ती झाल्यानंतर त्या पदधारकाची ज्येष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (Zero Seniority) राहील.

(क) गट-अ आणि गट-ब मधील अधिकाऱ्यांच्याबाबत अन्य महानगरपालिकेतून अहमदनगर महानगरपालिकेत बदलीचा निर्णय दोन्ही महानगरपालिकांच्या परस्पर संमतीने निश्चित अटी व शर्तीवर, शासन मान्यतेने घेतला जाईल.

७. **परिविक्षाधीन कालावधी.—**गट-अ आणि गट-ब मध्ये नामनिर्देशाद्वारे नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी त्यांच्या नेमणुकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल. परिविक्षाधीन कालावधी राज्य शासनाच्या आदेशानुसार पूर्ण केल्याचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तसेच अशा उमेदवाराचे परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब म्हणून आणि तत्संबंधी कारणे नमूद करुन परिविक्षा कालावधी पुढील १ वर्षापर्यंतच वाढविता येईल. तद्नंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

८. **भाषा परीक्षा, विभागीय परीक्षा व प्रशिक्षण.—**महापालिका सेवेतील पदांवर नेमणूक करण्यात आलेल्या किंवा त्यासाठी निवडण्यात आलेल्या उमेदवारांनी.

(१) विहित करण्यात येतील अशा भाषा परीक्षा आणि / किंवा चाचण्या उत्तीर्ण होणे किंवा त्यांना विहित नियमानुसार यापैकी कोणतीही परीक्षा पास होण्यापासून सूट मिळणे आवश्यक असेल.

(२) परिशिष्ट-३ अन्वये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविणे आवश्यक असेल.

(३) वेळोवेळी ठरवून देण्यात येईल असे सेवा प्रवेशपूर्व आणि / किंवा सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण घेणे सुद्धा आवश्यक असेल.

९. **महानगरपालिका सेवेतील पदावर नियुक्तीसाठी अनर्हता.—**

एखाद्या व्यक्तीस,—

(क) अधिनियमाच्या कलम ५९ च्या तरतुदीप्रमाणे अनर्ह ठरविण्यात आले असेल.

(ख) महापालिकेच्या सेवेतून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून किंवा कोणत्याही सरकारी सेवेतून गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा

(ग) ज्यामध्ये नैतिक अध:पाताचा समावेश होईल अशा अपराधाबद्दल तिला दोषी ठरविण्यात आले असेल, किंवा

(घ) जर त्याच्या एकापेक्षा अधिक पत्नी हयात असतील आणि स्त्री उमेदवारांच्या बाबतीत जर तिने ज्याची पत्नी हयात आहे अशा व्यक्तीशी विवाह केला असेल, किंवा

(च) जर तो/ती महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिपादन) नियम, २००५ मधील तरतुदींची पूर्तता करीत नसेल, किंवा

(छ) न्यायालयात ज्या गुन्ह्यासाठी कैदेची शिक्षा फर्मावता येते, अशा गुन्ह्यासाठी सहा महिन्यांहून अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल, अशी व्यक्ती किंवा,

(ज) महापालिकेच्या सेवेत असतांना सिद्धापराध होऊन सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल,

अशी व्यक्ती महापालिकेच्या सेवेत नेमणूक देण्यास वा नेमणूक चालू ठेवण्यास अपात्र समजली जाईल.

१०. **महानगरपालिका सेवेतील पदांवर आरक्षण.—**महानगरपालिका सेवेतील पदांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आरक्षण लागू असेल. यामध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षण (सामाजिक आरक्षण) विशेष / समांतर आरक्षण, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, अपंग, महिला, खेळाडू इ.साठीच्या आरक्षणाचा समावेश असेल.

११. **शारीरिक पात्रता प्रमाणपत्र आणि चारित्र्य पडताळणी अहवाल.—**महापालिका सेवेतील कोणत्याही पदावरील नामनिर्देशनाने नियुक्ती :—

(अ) महापालिकेच्या सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे विहित नमुन्यातील आरोग्यविषयक वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, आणि

(ब) उमेदवाराच्या पूर्वचारित्र्य पडताळणी बाबत (Verification of Antecedents) सक्षम प्राधिकाऱ्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर केली जाईल.

१२. **प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबावतंत्राचा वापर.—**कोणत्याही उमेदवाराच्या नियुक्तीसंदर्भात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या दबाव आणण्याचा केलेला प्रयत्न हा त्या उमेदवाराला त्या पदावरील नियुक्तीसाठी अनर्ह करणारा ठरेल.

१३. हे नियम अस्तित्वात येण्यापूर्वी विहित मार्गाने झालेल्या सरळसेवा नियुक्त्यांना शासनाने अन्यथा वेगळे लेखी कारणे नमूद करुन निर्देश दिले नसतील तर या नियमातील तरतुदीमुळे बाधा येणार नाही.

१४. वेळोवेळी सेवाभरती / आरक्षण / वयोमर्यादा / परिविक्षाधीन कालावधी नियमित करणे, इ. बाबत निर्देश देणारे राज्यशासनाचे नियम, अधिनियम निर्णय व न्यायनिर्णय यानुसार या नियमात सुधारणा (Amendement) करण्यात येईपर्यंत शासन निर्णय / न्याय निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१५. सदर सेवा प्रवेश नियम लागू झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत अहमदनगर महानगरपालिकेने या नियमातील आकृतीबंधास अनुरुप एकीकृत संवर्गाची यादी तयार करुन त्यास राज्यशासनाची मान्यता घेणे बंधनकारक राहील (परिशिष्ट-४).

---

## वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना

(नियम ४ पहा)

मी, याद्वारे प्रमाणित करतो / करते की, ———————————— महापालिकेच्या ( ) संवर्गातील ( ) पदावर नेमणूक करण्यासाठी असलेले उमेदवारांची तपासणी केली आणि त्याला / तिला ——————————— ———— अतिरिक्त (सांसर्गिक किंवा अन्य) कोणताही रोग, शारीरिक दौर्बल्य किंवा शारीरिक अपंगत्व असल्याचे आढळले नाही ही गोष्ट ( ) कार्यालयात ( ) म्हणून नेमणुकीसाठी अनर्ह ठरविणार आहे असे मला वाटत नाही. श्री./ श्रीमती ————— यांच्या स्वतःच्या निवेदनावरुन त्याचे / तिचे वय —— वर्ष आहे आणि दिसण्यावरुन तो / ती सुमारे – वर्ष वयाचा / वयाची आहे. त्याला / तिला लस टोचण्यात आली आहे.

ओळख चिन्हे ————————————

डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा ————————————

वैद्यकीय अधिकाऱ्याचे पदनाम ————————————

वैद्यकीय अधिकाऱ्याचे पदनाम

## अहमदनगर महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६

### परिशिष्ट १

### अंतर्गत सेवा भरतीसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती

१. **कर्मचारी निवड समिती.—**महानगरपालिका पदांवर नियुक्तीकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५४ मध्ये विहित केल्यानुसार कर्मचारी निवड समिती गठीत करण्यात येईल. याव्यतिरिक्त नामनिर्देशनाने नियुक्ती करताना, मागासवर्गीय तसेच महिला उमेदवारांच्या हितरक्षणासाठी अशा समितीचे सदस्य म्हणून शासनाच्या प्रचलित आदेशानुसार संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना मुलाखतीच्या वेळेस विशेष निमंत्रित म्हणून बोलावले जाईल.

२. **नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीसाठी कर्मचारी निवड समितीची रचना खालीलप्रमाणे असेल :—**

| | | |
|---|---|---|
| (१) आयुक्त किंवा आयुक्तांनी पदनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी | .. | अध्यक्ष |
| (२) मुख्य लेखा परीक्षक | .. | सदस्य |
| (३) संबंधित विभाग प्रमुख | .. | सदस्य |
| (४) आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला एक अन्य अधिकारी / मागासवर्गीय प्रतिनिधी | .. | सदस्य |
| (५) जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी | .. | सदस्य |
| (६) जिल्हा समाज कल्याण अधिकारी | .. | सदस्य |
| (७) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | .. | सदस्य |
| (८) अल्पसंख्याक प्रतिनिधी | .. | सदस्य |
| (९) उप आयुक्त (आस्थापना) | .. | सदस्य-सचिव व निमंत्रक |

३. **नामनिर्देशनाद्वारे नेमणुकीकरिता कार्यपध्दती.—** (अ) एखाद्या पदावरील नियुक्तीसाठी, वृत्तपत्रातील जाहिरातीला अनुसरुन किंवा महानगरपालिकेच्या सुचना फलकावरील सुचनेस अनुसरुन विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाचा किंवा सेवा विनियम केंद्राकडून वा शासनाच्या आदेशानुसार अन्यसंस्था / कार्यालयाकडून आलेल्या यादीतील उमेदवाराच्या नावाचाच विचार करता येईल.

(ब) उमेदवाराने अर्जात दिलेल्या तपशिलाबाबत अधिक माहिती मागविण्याचा अधिकार आयुक्तांना असेल.

(क) जाहिरातीत / सेवा विनियम केंद्राकडे पाठविलेल्या मागणीपत्रात लेखी चाचणीचा उल्लेख असल्यास अशा उमेदवारांना लेखी चाचणी द्यावी लागेल. परंतु, जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या आणि पात्र उमेदवारांची संख्या लक्षात घेऊन अशी चाचणी न घेण्याचा निर्णय आयुक्तांना घेता येईल.

(ड) निवड समिती यानंतर एकूण गुण लक्षात घेऊन गुणांच्या उतरत्या क्रमाने उमेदवारांची यादी तयार करील व ती आयुक्ताकडे पाठविण्यासाठी लिफाफ्यात बंद करील.

४. **पदोन्नतीने नेमणुकीकरिता कार्यपध्दती.—** (अ) पुढील कॅलेंडर वर्षाच्या कालावधीत प्रत्येक संवर्गात पदोन्नतीने किती पदे भरावी लागणार आहेत याचा आढावा आस्थापना विभागाने दरवर्षी ऑगस्ट महिन्यात किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर घ्यावा.

(ब) वर नमूद केलेल्या आढाव्यानुसार पदोन्नतीने भरावयाच्या पदांची संख्या निश्चित झाल्यावर पदोन्नतीसाठी आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांतून ज्येष्ठतानुक्रमाने पदांच्या संख्येच्या तिप्पट (१:३) कर्मचाऱ्यांचा विचारक्षेत्रात (Zone of Consideration) समावेश करण्यात येईल.

(क) ज्याच्या विरुध्द विभागीय चौकशी चालू असेल वा जे निलंबित आहेत त्यांचीही नावे ज्येष्ठतानुक्रमाने यादीत येत असल्यास अशा यादीतून वगळण्यात येऊ नयेत. त्यांच्या नावाचा विचार केल्यावर निवड समितीचा अभिप्राय त्यांच्या नावासमोर नोंदविण्यात यावा.

(ड) निवडसूचीत समावेश झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाची मागील पाच वर्षांची सरासरी क्रमवारी अतिउत्कृष्ट असेल अशा कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेप्रमाणे येणाऱ्या ६ स्थानापर्यत वरचे स्थान देण्याची शिफारस निवड समितीला करता येईल. हा अपवाद वगळता, पदोन्नतीसाठी पात्र ठरलेला कर्मचाऱ्यांचा निवडसूचीत ज्येष्ठतेनुसार समावेश करण्यात येईल. मात्र अत्युत्कृष्ट (अ+) अहवालासाठी कर्मचाऱ्यांला निवडसुचीत वरचा क्रमांक देतांना सेवेने ज्येष्ठ असलेल्या व उत्कृष्ट (अ) अहवाल असणाऱ्या कर्मचाऱ्यांपेक्षा वरचे स्थान देता येणार नाही.

(इ) दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर निवड समितीच्या बैठका विभागनिहाय आयोजित करण्यात येतील.

(ई) निवड समिती कर्मचाऱ्यांचे मागील ५ वर्षाचे गोपनीय अहवाल आणि त्यांचेपुढे ठेवलेली इतर कागदपत्रे यांचे अवलोकन करुन कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या योग्यतेबद्दल निर्णय घेईल. मात्र असा निर्णय एकमताने झाला नाही तर त्याबद्दलचा अंतिम निर्णय समिती प्रमुखाचा असेल.

(फ) कर्मचाऱ्यांच्या निवडीसंबंधी अंतिम निर्णय घेण्यापुर्वी अधिक माहितीची आवश्यकता वाटल्यास माहिती मागविण्याचा समितीस अधिकार असेल.

५. वरील (३) व (४) नुसार निवड समितीने केलेली शिफारस अधिनियमाच्या कलम ५३ (१), ५३ (२), व ५३ (३) नुसार संबंधित सक्षम नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी ठेवली जाईल.

६. तयार करण्यात आलेली निवडसूची तयार केल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीपर्यंत वैध असेल.

७. समिती सचिव बैठकीचा कार्यवृत्तांत तयार करुन त्यास समितीची मान्यता घेण्यास जबाबदार असेल. सदस्यांना सादर केलेली सर्व कागदपत्रे परत घेऊन ती एकत्रित जतन करण्याची जबाबदारी समिती सचिवाची असेल.

८. गट -क आणि गट -ड मध्ये सेवा भरती करतांना शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. न्याप्र-१००३/९९/प्र.क्र.२/०३ (भाग-२)/१६अ, दि.२५ ऑक्टोबर, २००५ अन्वये एकत्रित मार्गदर्शक तत्वाचा लागू असेल तेथे अवलंब करण्यात यावा. या मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी होणारे बदलही अंमलात आणण्यात यावेत.

९. तांत्रिक पदांना अतांत्रिक संवर्गामध्ये पदोन्नती देता येणार नाही.

## अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६

## परिशिष्ट २

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ व ५३ (१) च्या तरतुदींनुसार नेमणूक करावयाच्या पदांसाठी कलम ४५ (३) व ४५७ (३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता (पहा (नियम ३))

| | | | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | प्रशासकीय सेवा श्रेणी-१ | आयुक्त | | . . | राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमणूक करण्यात येईल, असा अधिकारी (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३६ प्रमाणे. |
| २ | प्रशासकीय सेवा श्रेणी-१ | अतिरिक्त आयुक्त | | . . | राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमणूक करण्यात येईल असा अधिकारी (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३६(अ) प्रमाणे. |
| ३ | प्रशासकीय सेवा श्रेणी-१ | उप आयुक्त | पदोन्नती ५०% | . . | महापालिका सेवेतील सहाय्यक आयुक्त या पदावरील ज्येष्ठता व गुणवत्ता या तत्वावर किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती ५०% | . . | राज्य शासन/स्थानिक स्वराज्य संस्थेतील समकक्ष अधिकाऱ्यांमधून शासनामार्फत नेमणूक करण्यात येईल. |
| ४ | प्रशासकीय सेवा श्रेणी-२ | सहाय्यक आयुक्त (सध्या आस्थापनेवर समकक्ष वे.श्रे. | पदोन्नती ५०% | . . | (१) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेची पदवी.<br>(२) उपरोक्त शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे प्रभाग अधिकारी कर्मचाऱ्यांमधून. किमान ५ वर्षांचा अनुभव. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | मधील मंजूर प्रशासनाधिकारी या पदाचे सहायक आयुक्त या पदनामात समावेशन) | पदोन्नती ५०% | | शासन सेवेतील / स्थानिक स्वराज्य सेवेतील समकक्ष पद ३ वर्षापासुन धारण करणारे अधिकारी. |
| ५ | प्रशासकीय सेवा श्रेणी-२ | प्रभाग अधिकारी (१) हेडक्लार्क (२) नाका सुप्रीटेंडेंट या पदांचे समावेशन | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>(ब) राज्य शासनाकडील मुख्य लिपिक किंवा समकक्ष वे.श्रे. मधील पदावरील किंवा अहमदनगर महापालिका आस्थापनेवरील अधीक्षक या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सरळ सेवेने नेमणूक करता येईल. |
| | | | पदोन्नती १००% | | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिकेच्या आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे अधिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | | शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील समकक्ष पद ३ वर्षापासून धारण करणारे अधिकारी. |
| ६ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | अधीक्षक/मिळकत व्यवस्थापक (१) स्टोअर सुपर वाईझर (२) आस्थापना प्रमुख (३)असि.टु.हेडक्लार्क (४) कॅशियर (५)अध्यक्ष निजी सचिव या पदांचे समावेशन | पदोन्नती १००% | | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>(ब) उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे मुख्य लिपिक या संवर्गातील किमान ५ वर्षांचा अनुभव.<br>(क) विभागीय परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. |
| ७ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | मुख्य लिपिक (१)हेडक्लार्क,बा.दे. दवाखाना. (२) नाका इन्सपेक्टर (३) शिरस्तेदार (४) स्टोअर किपर (५) हेडक्लार्क पा.पु. (६) हेड रजि. क्लार्क | नामनिर्देशन २५% | ३३ | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>(ब) शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील वरिष्ठ लिपिक किंवा समकक्ष वे.श्रे.मधील पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव. किंवा अहमदनगर महापालिका आस्थापनेवरील वरिष्ठ लिपिक या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सरळ सेवेने नेमणूक करता येईल. |
| | | (७) इंग्रजी टाय कम रेकॉर्ड किपर. (८) हेडक्लार्क आरोग्य. | पदोन्नती ७५% | | (अ) अ.नगर महानगरपालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे वरिष्ठ लिपिक या संवर्गात किमान ५ वर्षांचा अनुभव.<br>(ब) विभागीय परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | (९) हेडक्लार्क बांधकाम (१०) हेडवसुली (११) रेकॉर्ड किपर या पदांचे समावेशन मुख्य लिपिक (१) सा.प्र.वि. (२) अभिलेख विभाग (३) आस्थापना वि. (४) नगरसचिव वि. (५) प्रसिद्धी विभाग (६) एल.बी.टी. वि. (७) माहिती सुविधा केंद्र (८) प्रभाग समिती कार्यालये (९) कर विभाग (१०) बांधकाम वि. (११) पा.पु.विभाग (१२) नगररचना वि. (१३) यांत्रिकी विभाग (१४) आरोग्य प्रशासन. (१५) मनपा रुग्णालय | | | |
| ८ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | वरिष्ठ लिपिक (१) प्रशासन अधिकारी क्लार्क (२) प्रा.फंड क्लार्क (सिनी.) (३) पेन्शन क्लार्क (सिनी.), (४) लेबर ऑफिसर क्लार्क (५) आस्थापना लिपिक, (६)ऑडीट क्लार्क (सिनी.) (७) स्थायी समिती क्लार्क (८) ज. बो.क्लार्क, (९) सिनि.कोर्ट क्लार्क, (१०)असि. स्टोअर किपर | . . | . . | (अ) महानगरपालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता आधारे लिपिक टंकलेखक या संवंर्गातील किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. (ब) विभागीय परीक्षा उत्तीर्ण आवश्यक (क) MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. |

**परिशिष्ट २—चालू**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | (११) स्टोअर क्लार्क (सिनी.) (१२) स्टोअर क्लार्क बांधकाम (१३) असि.रजि. क्लार्क (सिनी.) (१४) असि. नाका इंस्पे. (१५) नाका चेकर (१६) असि. रेकॉर्ड किपर (१७) वारट क्लार्क (१८) सॅनि. बिल्डींग क्लार्क (१९) असि. क्लार्क आरोग्य (सिनी.) (२०) मस्टर क्लार्क आरोग्य (सिनी.) (२१) बा.दे. दवा क्लार्क (२२) पवडी अकौंटट कलार्क (सिनी.) (२३) इस्टेट प्रा. क्लार्क (सिनी.) (२४) मस्टर क्लार्क बांधकाम (सिनी.) (२५) मोव्हे.क्लार्क (सिनी.) (२६) जलविहार क्लार्क (सिनी.) (२७) मराठी टायपिस्ट (सिनी) (२८) इंग्रजी टायपिस्ट (सिनी.) या पदांचे समावेशन | | | |
| ९ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | लिपिक टंकलेखक (१) ऑडिट क्लार्क (ज्यु.) (२) इंग्रजी बॅच टाय. (ज्यु.) (३) बारनिशी क्लार्क (४) ज्युनियर क्लार्क (५) कोर्ट क्लार्क | नामनिर्देशन ७५% | ३३ | (अ) एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण (ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. (जीसीसी) / इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.परीक्षा उत्तीर्ण. (क) महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E,A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किवा O स्तर किवां A स्तर किंवा B किंवा C स्तर |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | (ज्यु.) (६) स्टोअर | | | पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| | | क्लार्क (ज्यु.) | | | (ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| | | (७) असि. रजि. | पदोन्नती २५% | | (अ) किमान एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण. |
| | | क्लार्क (ज्यु.) | | | (ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. |
| | | (८) नाका क्लार्क | | | (जीसीसी) / इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण. |
| | | (९) रेकॉर्ड क्लार्क | | | (क) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण |
| | | (ज्यु.) (१०) वसुली | | | (ड) किमान ५ वर्षांचा अनुभव असलेल्या शिपाई / |
| | | शिरस्तेदार | | | बिगारी किंवा तत्सम गट-ड च्या संवर्गातून ज्येष्ठता व |
| | | (११) असि.वॉ. | | | गुणवत्ता या आधारे नेमणूक करता येईल. |
| | | क्लार्क (ज्यु.) | | | |
| | | (१२) वसुली क्लार्क | | | |
| | | (१३) व्हील टॅक्स | | | |
| | | क्लार्क | | | |
| | | (१४) लिपिक मजिप्रा | | | |
| | | (१५) केमिकल | | | |
| | | क्लार्क | | | |
| | | (१६) कोंडवाडा | | | |
| | | क्लार्क (१७) वार्ड | | | |
| | | इन्सपेक्टर | | | |
| | | (१८) जन्म - मृत्यु | | | |
| | | क्लार्क (१९) मस्टर | | | |
| | | क्लार्क (ज्यु.) | | | |
| | | (२०) लायसन | | | |
| | | क्लार्क | | | |
| | | (२१) केसपेपर | | | |
| | | रायटर | | | |
| | | (२२) रक्तपेढी | | | |
| | | क्लार्क | | | |
| | | (२३) गार्डन | | | |
| | | कमिटी क्लार्क | | | |
| | | (२४) ज्यु. इंजि. | | | |
| | | मस्टर क्लार्क | | | |
| | | (२५) मस्टर | | | |
| | | क्लार्क (पवडी) | | | |
| | | (ज्यु.) (२६) मो.व्हे. | | | |
| | | क्लार्क (ज्यु.) | | | |
| | | (२७) बिल्डिंग | | | |
| | | वॉर्ड इन्सपेक्टर | | | |
| | | (२८) नगररचना | | | |
| | | लिपिक | | | |
| | | (२९) इन्क्रोचमेंट | | | |

परिशिष्ट २—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | क्लार्क ३०) ज्यु क्लार्क इले. ३१) जलविहार क्लार्क (ज्यु.) ३२) मार्केट क्लार्क ३३) बुक बॅक क्लार्क (ज्यु.) ३४) अकौंट क्लार्क (ज्यु.) ३५) पेंशन क्लार्क (ज्यु.) या पदांचे समावेशन | | | |
| १० | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | वाहनचालक (हलके वाहन) मोटार ड्रायव्हर, या पदांचे समावेशन | नामनिर्देशन ५०% | ३३ वर्षे | (अ) १० वी परीक्षा उत्तीर्ण (मराठी विषय)<br>(ब) हलके वाहन चालविण्याचा परवाना<br>(क) परवाना मिळाल्यानंतर वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव.<br>(ड) मराठी लिहिता, बोलता व वाचता येणे आवश्यक.<br>(इ) वाहनदुरुस्ती देखभालीचे कामासंबंधी प्रशिक्षणाचे शासनमान्य शैक्षणिक संस्थेचे प्रमाणपत्र धारण करणाऱ्यास प्राधान्य.<br>(फ) महापालिका सेवेतील गट-ड मधील कर्मचाऱ्यांना प्राधान्य. |
| | | | पदोन्नती ५०% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील गट-ड या संवर्गातील ५ वर्षांचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे पदोन्नतीने नेमणूक. |
| ११ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | वाहनचालक (जड वाहन) ड्रायव्हर, रोड रोलर ड्रायव्हर, ट्रक्टर ड्रायव्हर या पदांचे समावेशन | नामनिर्देशन ५०% | ३३ वर्षे | (अ) १० वी परीक्षा उत्तीर्ण (मराठी विषय)<br>(ब) जड वाहन चालविण्याचा परवाना<br>(क) परवाना मिळाल्यानंतर जड वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव.<br>(ड) मराठी लिहिता, बोलता व वाचता येणे आवश्यक.<br>(इ) वाहनदुरूस्ती देखभालीचे कामासंबंधी प्रशिक्षणाचे शासनमान्य शैक्षणिक संस्थेचे प्रमाणपत्र धारण करणाऱ्यास प्राधान्य.<br>(फ) महापालिका सेवेतील गट-ड मधील कर्मचाऱ्यांना प्राधान्य. |
| | | | पदोन्नती ५०% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील गट-ड या संवर्गातील ५ वर्षांचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे पदोन्नतीने नेमणूक. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १२ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | लघुलेखक (उच्चश्रेणी) मराठी स्टेनो / इंग्रजी स्टेनो.या पदांचे समावेशन | पदोन्नती १००% | . . | (अ) महापालिकेच्या आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे लघुलेखक (निम्नश्रेणी) या संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून पदोन्नती. ५ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>(ब) मराठी / इंग्रजी लघुलेखन १२० श.प्र.मि. उत्तीर्ण व टंकलेखन ४० श.प्र.मि. वेगाची शासनाची (जी.सी.सी.) परीक्षा उत्तीर्ण.<br>(क) एम.एस्.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण. |
| १३ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | नामनिर्देशन ५०% | ३३ वर्षे | (अ) बारावी परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) राज्य शासनाची इंग्रजी अथवा मराठी लघुलेखनाची १०० श.प्र.मि. व ४० श.प्र.मि. वेगाची टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण.<br>(क)एम.एस.सी.आय.टी.परीक्षा उत्तीर्ण. |
| | | | पदोन्नती ५०% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिकेच्या आस्थापनेवरील किमान ३ वर्षांच्या सेवेनंतर लघुटंकलेखक संवर्गाच्या कर्मचाऱ्यांमधून ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे पदोन्नतीने नेमणूक. |
| १४ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | लघुटंकलेखक | नामनिर्देशन ५०% | ३३ वर्षे | (अ) बारावी परीक्षा उत्तीर्ण<br>(ब) राज्य शासनाची मराठी लघुलेखनाची ८० श.प्र.मि. व ३० श.प्र.मि. वेगाची टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण.<br>(क) एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण. |
| | | | पदोन्नती ५०% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिकेच्या आस्थापनेवरील किमान ३ वर्षांच्या सेवेनंतर लिपिक टंकलेखक संवर्गाच्या कर्मचाऱ्यांमधून ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे पदोन्नतीने नेमणूक.<br>लघुटंकलेखक पदावर पदोन्नतीने किंवा सरळसेवेने नियुक्त कर्मचाऱ्याचा प्रशासकीय सेवेतील अधीक्षक, मुख्य लिपिक पदावर पदोन्नतीसाठी विचार केला जाणार नाही. |
| १५ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | हवालदार | पदोन्नती १००% | . . | (१) एस एस सी उत्तीर्ण.<br>(२) नाईक या संवर्गातून ज्येष्ठता या आधारे पदोन्नतीने नेमणूक.<br>(३) सदर पदावरील किमान तीन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक. |
| १६ | प्रशासकीय सेवा श्रेणी-४ | नाईक | पदोन्नती १००% | . . | (१) एस एस सी उत्तीर्ण.<br>(२) शिपाई संवर्गातून ज्येष्ठता या आधारे पदोन्नतीने नेमणूक.<br>(३) सदर पदावरील किमान पाच वर्षांचा अनुभव असणे आवश्यक. |
| १७ | प्रशासकीय सेवा | **शिपाई,**<br>(१) लेबर ऑफीस शिपाई,<br>(२) आस्थापना शिपाई, | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | (३) ऑडीट शिपाई,<br>(४) ऑफीस शिपाई,<br>(५) स्टोअर शिपाई,<br>(६) नाका शिपाई,<br>(७) अल्ट्रेशन शिपाई,<br>(८) वार्ड शिपाई,<br>(९) व्हेक्सिनेटर शिपाई, (१०) बादेद शिपाई, (११) फे.प्ले. शिपाई, (१२) जिजा. द् शिपाई, (१३) दाणे. द शिपाई,<br>(१४) तोफ-नवी., दवाखाना शिपाई,<br>(१५) इस्टेट प्रॉ. शिपाई,<br>(१६) ज्यु.इं. ऑफीस शिपाई,<br>(१७) स्टे. कमिटी शिपाई,<br>(१८) बे. शिपाई,<br>(१९) वसुली शिपाई,<br>(२०) नगररचना शिपाई,<br>(२१) गार्ड्न कमिटी शिपाई,<br>(२२) अटेंडंस,<br>(२३) नाका हमाल या पदांचे समावेशन. | | | |
| १८ | कर सेवा श्रेणी-१ | मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी | नामनिर्देशन / प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | ४० वर्ष | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>(ब) विक्रीकर अधिकारी (वर्ग-१)/ मुख्य अधिकारी (वर्ग-१) अथवा समकक्ष वे.श्रे.मधील पदावरील ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | पदोन्नती १००% | . . | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>(ब) उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे सहायक कर निर्धारक व संग्राहक (वर्ग- २) या पदावर किमान ०५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १९ | कर सेवा श्रेणी-२ | सहायक कर निर्धारक व संग्राहक | नामनिर्देशन/ प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी. (ब) राज्य शासनाकडील विक्रीकर अधिकारी (वर्ग-२)/ मुख्य अधिकारी (वर्ग-२) अथवा समकक्ष वे.श्रे.मधील पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे अधीक्षक संवर्गात किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| २० | प्रशासकीय सेवा श्रेणी-२ | कामगार अधिकारी, लेबर कम पर्सनल ऑफिसर या पदाचे समावेशन | पदोन्नती १००% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता आणि डिप्लोमा इन लेबर लॉ किंवा विधि शाखेच्या पदवीधरास प्राधान्य. तसेच महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे उप कामगार अधिकारी या पदाचा किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| २१ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | उप कामगार अधिकारी | नामनिर्देशन/ पदोन्नतीकरिता अर्हताधारक उमेदवार उपलब्ध नसल्यास | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा समकक्ष अर्हता आणि डिप्लोमा इन लेबर लॉ किंवा विधि शाखेच्या पदवीधरास प्राधान्य. (ब) शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील वरिष्ठ लिपिक किंवा समकक्ष वे.श्रे.मधील पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सरळ सेवेने नेमणूक करता येईल. |
| | | | पदोन्नती १००% | . . | (अ) नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिकेच्या आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे वरिष्ठ लिपिक या संवर्गातील विभागीय परीक्षा उत्तीर्ण कर्मचाऱ्यांमधुन. (ब) उपरोक्त पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| २२ | विधि सेवा श्रेणी-२ | विधि अधिकारी / कायदा अधिकारी | नामनिर्देशन / पदोन्नतीकरिता अर्हताधारक उमेदवार उपलब्ध नसल्यास | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा विधि शाखेचा पदवीधर. पदव्युत्तर पदवीधारकास प्राधान्य (एल.एल.एम.) (ब) जिल्हा न्यायालयातील स्वतंत्र वकिलीचा ५ वर्षांचा विशेषतः महानगरपालिका अधिनियम, कॉन्ट्रक्ट ॲक्ट, प्रशासकीय व कामगार विषयक अधिनियमाच्या कामाचा अनुभव. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिकेच्या आस्थापनेवरील सहायक विधि अधिकारी संवर्गात ५ वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या व इतर अर्हता धारण करणाऱ्यास प्राधान्य. |
| २३ | विधी सेवा श्रेणी-३ | सहायक विधी / कायदा अधिकारी | नामनिर्देशन / पदोन्नतीकरिता अर्हताधारक उमेदवार उपलब्ध नसल्यास | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधि शाखेची पदवी. (ब) शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील न्यायालयीन कामाशी संबंधित पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव किंवा सत्र न्यायालयातील ५ वर्ष वकिलीचा अनुभव. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व महापालिका आस्थापनेवरील कनिष्ठ विधि अधिकारी म्हणून ५ वर्षांचा अनुभव. |
| २४ | विधी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ विधी अधिकारी | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधि शाखेची पदवी.<br>(ब) शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील न्यायालयीन कामाशी संबंधित पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव किंवा सत्र न्यायालयातील ३ वर्ष वकिलीचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सरळ सेवेने नेमणूक करता येईल. |
| २५ | प्रशासकीय सेवा श्रेणी-२ | माहिती व जनसंपर्क अधिकारी, प्रसिध्दी अधिकारी या पदाचे समावेशन | नामनिर्देशन | ३३ वर्षे | (१) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>(२) पत्रकारिता व जनसंज्ञापन. (Journalisam & Mass Communication) मधील पदविका आवश्यक.<br>(३) शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेतील सहायक माहिती व जनसंपर्क विभाग या संवर्गातील ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिकेच्या आस्थापनेवरील ज्येष्ठता व पात्रता या आधारे मुख्य लिपिक या संवर्गातील पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव. विभागीय परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने नियुक्ती. |
| | | | प्रतिनियुक्ती | . . | राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालयनातील समकक्ष अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने नियुक्ती. |
| २६ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | दुरध्वनी चालक श्रेणी-३ | नामनिर्देशनाने १००% | ३३ वर्षे | (अ) महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) शासनमान्य संस्थेचा वा शासकीय आय.टी.आय. चा टेलीफोन ऑपरेटर अभ्यासक्रम पूर्ण.<br>(क) मराठी, हिंदी व इंग्रजीत संभाषण करण्याचा सराव आवश्यक. |
| | | | पदोन्नती | . . | नामनिर्देशनाने विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्यांमधून ज्येष्ठता व गुणवत्तेनुसार. |
| २७ | सचिव सेवा श्रेणी-२ | नगरसचिव | नामनिर्देशन :- (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास.) | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>(ब) विधि शाखेच्या पदवीधरास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील अधीक्षक पदाचा किमान ५ वर्षांचा अनुभव. ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे पदोन्नती. |
| २८ | सुरक्षा सेवा श्रेणी-२ | सुरक्षा अधिकारी | नामनिर्देशन :- पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास. | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर किंवा समकक्ष अर्हता.<br>(ब) लष्कर, निमलष्कर दलातील ज्युनिअर कमिशनर ऑफीसर अथवा पोलीस दलातील पोलीस निरीक्षक या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | (क) किमान शारीरिक पात्रता, उंची १६५ से.मी., छाती- ८१ से.मी. (फुगवून- ८५ से.मी.), वजन- ५० कि.ग्रॅ., चांगली दृष्टी. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील सहा. सुरक्षा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांमधून ५ वर्षांचा अनुभव. |
| २९ | सुरक्षा सेवा श्रेणी-३ | सहायक सुरक्षा अधिकारी | नामनिर्देशन १००% | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर किंवा समकक्ष अर्हता. (ब) लष्कर, निमलष्कर दल अथवा पोलीस दलातील किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| ३० | सुरक्षा सेवा श्रेणी-३ | सुरक्षा रक्षक | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण. (ब) किमान शारीरिक पात्रता- उंची १६५ से.मी., वजन- ५० कि.ग्रॅ., छाती- ८१ से.मी., फुगवुन- ८६ से.मी., चांगली दृष्टी. |
| ३१ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | ग्रंथपाल | नामनिर्देशन पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास. | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची ग्रंथालय शास्त्राची (B. Lib.) पदवी. (ब) पदव्युत्तर पदवी (M. Lib.) असल्यास प्राधान्य. (क)शासकीय, निमशासकीय शैक्षणिक संस्थामधील अनुभवास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील सहा. ग्रंथपाल या संवर्गातील कर्मचाऱ्यांतून ५ वर्षांचा अनुभव. |
| ३२ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | सहायक ग्रंथपाल | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची ग्रंथालय शास्त्राची (B. Lib.) पदवी. (ब) शासकीय, निमशासकीय किंवा शैक्षणिक संस्थेचा ३ वर्षांच्या अनुभवास प्राधान्य. |
| ३३ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | समाज विकास अधिकारी | नामनिर्देशन १००% | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाचे समाजशास्त्र शाखेची पदवी किंवा कोणत्याही शाखेतील पदवी आणि M.S.W. पदव्युत्तर पदवी. (ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील उपसमाज कल्याण अधिकारी किंवा सहायक समाज विकास अधिकारी या पदावरील किमान ०५ वर्षांचा अनुभव असलेले. |
| ३४ | लेखा परिक्षण सेवा श्रेणी-१ | मुख्य लेखापरीक्षक | नामनिर्देशन :- (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० वर्षे | (अ) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी किंवा सी.ए. (चार्टर्ड अकाऊंटंट) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. (ब) राज्य शासनाकडील M.A.F.S. (महाराष्ट्र अकाऊंट अँन्ड फायनान्स सर्व्हिसेस, वर्ग-१) परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारास प्राधान्य. (क) शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थामधील लेखा संवर्गातील वर्ग-२ च्या पदावरील ७ वर्षांचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सरळसेवेने नेमणूक करता येईल. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नती १००% | | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी.<br>(ब) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी आवश्यक.<br>(क) महापालिका विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या उप मुख्य लेखापरीक्षक (वर्ग २) पदावरील किमान ७ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| | | | प्रतिनियुक्ती | . . | शासनाकडील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने. |
| ३५ | लेखा परिक्षण सेवा श्रेणी-२ | ऑडिटर (१) उप मुख्य लेखापरीक्षक | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० वर्षे | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी.<br>(ब) वित्तीय व्यवस्थापनेतील पदव्युत्तर पदवी/पदविका किंवा वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी आवश्यक.<br>(क) शासनाकडील/स्था.स्व.सं.मधील सहायक लेखा अधिकारी या किंवा समकक्ष वे.श्रे.मधील पदावरील ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | पदोन्नती १००% | . . | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>(ब) महापालिका विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या लेखा परीक्षक्/सहायक लेखा अधिकारी या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | . . | महाराष्ट्र शासनाकडील महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील वर्ग-२ अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्ती. |
| ३६ | लेखा परिक्षण सेवा श्रेणी-३ | लेखापरीक्षक | नामनिर्देशन २५% | ३३ वर्षे | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी.<br>(ब) राज्य शासनाकडील/स्था.स्व.संस्थामधील उप लेखापाल अथवा महापालिका आस्थापनेवरील उप लेखापाल या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सरळ सेवेने नेमणूक करता येईल.<br>(क) निवड झालेल्या उमेदवारास विभागीय परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल. |
| | | | पदोन्नती ७५% | . . | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी.<br>(ब) महापालिका विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या रोखपाल या किंवा समकक्ष वे.श्रे.मधील पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव असणाऱ्या अधिकाऱ्यातून ज्येष्ठता व पात्रतेच्या निकषांन्वये पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ३७ | लेखा सेवा श्रेणी-१ | मुख्यलेखाधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४५ वर्षे | (अ) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी किंवा सी.ए. (चार्टर्ड अकाऊंटंट) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>(ब) शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थामधील लेखा संवर्गातील वर्ग-२ च्या पदावरील ७ वर्षांचा अनुभव अनिवार्य. |
| | | | पदोन्नती १००% | . . | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>(ब) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी आवश्यक.<br>(क) महापालिका विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या कार्यरत लेखाधिकारी (वर्ग-ब) संवर्गाचा ५ वर्षांचा अनुभव. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रतिनियुक्ती | . . | शासनाकडील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने. |
| ३८ | लेखा सेवा श्रेणी-२ | लेखाधिकारी (अकौंटंट) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी. (ब) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी/पदविका किंवा वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी धारक उमेदवार असल्यास प्राधान्य अथवा राज्य शासनाकडील एम.ए.एस. (महाराष्ट्र अकाऊंट सर्व्हीसेस, कनिष्ठस्तर) परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. (क) शासनाकडील / स्था.स्व.सं.कडिल सहायक लेखा अधिकारी या पदावरील ०५ वर्षांचा अनुभव . |
| | | | पदोन्नती १००% | | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी (ब) महापालिका विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या सहायक लेखा अधिकारी किंवा समकक्ष वे.श्रे.मधील पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ३९ | लेखा सेवा श्रेणी-३ | सहायक लेखाधिकारी (असि.टु.अकौंटंट) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ३३ वर्षे | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी. (ब) राज्य शासनाकडील/स्था.स्व.संस्थामधील उप लेखापाल अथवा महापालिका आस्थापनेवरील रोखपाल पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सरळ सेवेने नेमणूक करता येईल. (क) निवड झालेल्या उमेदवारास विभागीय परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल. |
| | | | पदोन्नती १००% | | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी. (ब) महापालिका विभागीय परीक्षा (लेखा)उत्तीर्ण असलेल्या रोखपाल किंवा समकक्ष वे.श्रे. मधील पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव असणाऱ्या अधिकाऱ्यातून ज्येष्ठता व पात्रतेच्या निकषांन्वये पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ४० | लेखा सेवा श्रेणी-३ | रोखपाल | नामनिर्देशन १/३ | ३३ वर्षे | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी. (ब) शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेकडील वरिष्ठ लिपिक (लेखा) या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव. (क) निवड झालेल्या उमेदवारास विभागीय परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल. |
| | | | पदोन्नती २/३ | . . | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी. (ब) महापालिका विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या वरिष्ठ लिपिक (लेखा) या पदावरील किमान ३ वर्षांचा अनुभव. |
| ४१ | लेखा सेवा श्रेणी-३ | वरिष्ठ लिपिक (लेखा) [प्रा.फंड क्लार्क (सि) पेंशन क्लार्क (सि)] | पदोन्नती १००% | | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी. (ब) विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या लिपिक टंकलेखक या पदावरील किमान ३ वर्षांचा अनुभव. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ४२ | तांत्रिक सेवा श्रेणी-२ | सिस्टीम मॅनेजर | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकीमधील पदवी (B.E. Computer) किंवा समकक्ष अर्हता.<br>(ब) डेटा सेंटर अँडमिनीस्ट्रेशन नेटवर्किंग (लॅन, वॅन, Compount) हार्डवेअर मधील ०५ वर्षांचा अनुभव. |
| | | | पदोन्नती १००% | . . | संगणक विभागातील सिस्टिम अँनालिस्ट / संगणक प्रोग्रमर या पदावर किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| ४३ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | संगणक प्रोगॅमर | नामनिर्देशन १००% | ३३ | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकी मधील पदवी (B.F.Computer) किंवा समकक्ष अर्हता.<br>(ब) सिस्टीम अँनालिस्ट / प्रोग्रामिंग / सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट मधील किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| ४४ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-१ | शहर अभियंता | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० | (अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>(ब) एम.ई. (स्ट्रक्चर / रोड अँण्ड ब्रिजेस / पर्यावरण अभियांत्रिकी / सिव्हिल / वॉटर रेसॉरसेस / सिव्हिल सॉईल /सिव्हील कन्स्ट्रक्शन / सिव्हिल ट्रान्सपोर्टेशन व तत्सम विषयातील) पदव्युत्तर पदवी धारकास प्राधान्य.<br>(क) राज्य शासनाकडील व महानगरपालिका कडील उप अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महानगरपालिका सेवेतील उप अभियंता पदावरील किमान ०५ वर्षांचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | . . | राज्य शासनाच्या कार्यकारी अभियंता संवर्गातील अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने |
| ४५ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-१ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० | (अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>(ब) एम.ई. (स्ट्रक्चर / रोड अँण्ड ब्रिजेस / पर्यावरण अभियांत्रिकी / सिव्हिल / वॉटर रेसॉरसेस / सिव्हिल सॉईल /सिव्हील कन्स्ट्रक्शन / सिव्हिल ट्रान्सपोर्टेशन व तत्सम विषयातील) पदव्युत्तर पदवी धारकास प्राधान्य.<br>(क) राज्य शासनाकडील व महानगरपालिकाकडील उप अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महानगरपालिका सेवेतील उप अभियंता पदावरील किमान ०५ वर्षांचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | . . | राज्य शासनाच्या कार्यकारी अभियंता संवर्गातील अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ४६ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-१ | उप अभियंता (स्थापत्य) सिव्हिल इंजिनियर या पदांचे समावेशन | नामनिर्देशन ५०% | ३३ वर्षे | (१) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रीकी शाखेतील पदवी.<br>(२) राज्य शासनाकडील / स्थानिक स्वराज्य संस्थामधील कनिष्ठ अभियंता या पदावरील किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>(३) पदव्युत्तर पदवी आणि / अथवा समकक्ष पदावरील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| | | | पदोन्नती ५०% | | (१) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रीकी शाखेतील पदवी/ पदविका.<br>(२) उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कार्यरत शाखा अभियंता या संवर्गात किमान ०५ वर्षांचा अनुभव अथवा कनिष्ठ अभियंता या संवर्गात ०८ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ४७ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-२ | शाखा अभियंता (स्थापत्य) [कनिष्ठ अभियंता/ ज्यु. इंजिनियर (सिव्हील)] | नामनिर्देशन ५०% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी / पदविका परिक्षा उत्तीर्ण.<br>(ब) समतुल्य पदावरील कामाच्या अनुभव धारकास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती ५०% | . . | (अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी / पदविका परिक्षा उत्तीर्ण.<br>(ब) महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे कार्यरत कनिष्ठ अभियंता पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ४८ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदविका.<br>(ब) ३ वर्षांचा संबंधित कामाचा अनुभव. किंवा<br>(क) स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण. |
| ४९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | अभियांत्रिकी सहायक | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण. आणि<br>(ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था आरेखक (स्थापत्य) पाठ्यक्रम परीक्षा उत्तीर्ण. किंवा शासनमान्य औद्योगिक तंत्र निकेतनाची भूमापक पाठ्यक्रम परीक्षा उत्तीर्ण. किंवा शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकी (कंन्सट्रक्शन) पाठ्यक्रम परीक्षा उत्तीर्ण. |
| ५० | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | गवंडी | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (१) एस एस सी पास<br>(२) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा गवंडी कोर्स पास. |
| ५१ | प्रशासकीय सेवा श्रेणी-४ | बिगारी/वॉचमन (बिगारी/मजूर/ वॉचमन/चौकीदार) | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सदर संवर्गाच्या प्रचलित सेवा प्रवेश नियमानुसार. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ५२ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-१ | जल अभियंता | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य/यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) एम्.ई. (पर्यावरण अभियांत्रिकी / सिव्हील/ वॉटर रेसॉरसेस/ सिव्हील सॉईल/ सिव्हील ट्रान्सपोर्टेशन व तत्सम विषयातील) पदव्युत्तर पदवीधारकास प्राधान्य.<br>(क) राज्य शासनाकडील व महानगरपालिकेकडील उप अभियंता (पाणीपुरवठा/पाटबंधारे विभाग) या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | पदोन्नती १००% | . . | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य/यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे उप अभियंता (पाणीपुरवठा) पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | . . | राज्य शासनाच्या कार्यकारी अभियंता संवर्गातून प्रतिनियुक्तीने. |
| ५३ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-१ | कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य/यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) एम्. ई. (पर्यावरण अभियांत्रिकी / सिव्हील/ वॉटर रेसॉरसेस/सिव्हील सॉईल/सिव्हील ट्रान्सपोर्टेशन व तत्सम विषयातील) पदव्युत्तर पदवीधारकास प्राधान्य.<br>(क) राज्य शासनाकडील व महानगरपालिकेकडील उप अभियंता (पाणीपुरवठा/पाटबंधारे विभाग) या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | पदोन्नती १००% | . . | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य/यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे उप अभियंता (पाणीपुरवठा) पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | . . | राज्य शासनाच्या कार्यकारी अभियंता संवर्गातून प्रतिनियुक्तीने. |
| ५४ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-१ | उप अभियंता (पाणीपुरवठा) मॅकेनिकल इंजिनियर या पदांचे समावेशन | नामनिर्देशन २५% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य/यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>(ब) राज्य शासनाकडील/स्थानिक स्वराज्य संस्थामधील कनिष्ठ अभियंता या पदावरील किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>(क) पदव्युत्तर पदवी आणि/अथवा समकक्ष पदावरील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती ७५% | . . | महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कार्यरत शाखा अभियंता (स्थापत्य/ यांत्रिकी ) या संवर्गात किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ५५ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-२ | शाखा अभियंता (यांत्रिकी) | नामनिर्देशन ५०% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची अथवा समतुल्य शाखेची पदवी/पदविका. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | (ब) पदव्युत्तर पदवी आणि अथवा समतुल्य पदावरील कामाच्या अनुभव धारकांस प्राधान्य. |
| | | | पदोन्नती ५०% | . . | महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे कार्यरत कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ५६ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची पदविका<br>(ब) ३ वर्षांचा संबंधित कामाचा अनुभव किंवा<br>(क) यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेतील पदवी. |
| ५७ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | गाळणी निरीक्षक | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | . . | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची शास्त्र शाखेची पदवी (बी.एस्सी. (केमिस्ट्री विषयासह) अनुभव : फिल्टर वॉटर ट्रिटमेंट प्लांट चालविण्याच्या कामाचा ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | . . | (अ) १२ वी विज्ञान पास. शासनमान्य विद्यापीठाचा विज्ञान शाखेचा रसायन शास्त्र विषयातील पदवीधर असल्यास प्राधान्य.<br>(ब) लॅब टेक्निशियनची पदविका आवश्यक.<br>(क) उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या गाळणी परिचर (पाणी लॅब टेक्निशियन) या पदावरील कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने. ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र आवश्यक. |
| ५८ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | गाळणी परिचर (पाणी लॅब टेक्निशियन) | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) १२ वी विज्ञान परीक्षा पास. शासनमान्य विद्यापीठाचा विज्ञान शाखेचा रसायन शास्त्र विषयातील पदवीधर असल्यास प्राधान्य.<br>(ब) लॅब टेक्निशियनची पदविका आवश्यक. MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र आवश्यक. |
| ५९ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | पंप चालक | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परिक्षा उत्तीर्ण<br>(ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे पंप ऑपरेटर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र<br>(क) अनुभवास प्राधान्य |
| ६० | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | हेडफिटर | पदोन्नती १००% | . . | महानगरपालिकेच्या सेवेतील फिटर/असि.फिटर/मीटर रिडर या संवर्गातील ५ वर्षांचा अनुभव |
| ६१ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | फिटर, मिटर रिडर (फिटर, असि.फिटर) | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परिक्षा उत्तीर्ण<br>(ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र<br>(क) अनुभवास प्राधान्य. |
| ६२ | तांत्रिक सेवा श्रेणी-४ | व्हॉलमन | पदोन्नती १००% | ३३ वर्षे | (अ) इयत्ता ४ थी पास.<br>(ब) पा.पु.विभागाकडील संबंधित कामाचा ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ६३ | शहर विकास सेवा श्रेणी-१ | उप संचालक नगररचना | नामनिर्देशन (प्रतिनियुक्तीने उपलब्ध न झाल्यास) | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी (बी.ई.- सिव्हील) किंवा आर्किटेक शाखेची (B. Arch) पदवी.<br>(ब) एम.ई. (टाऊन शिप) पदवीधारकास प्राधान्य दिले जाईल.<br>(क) राज्य/केंद्र शासनाकडील नगररचना विषयाचा मान्यताप्राप्त अभ्यासक्रम पूर्ण. सहायक संचालक, नगररचना किंवा तत्सम पदावरील किमान ५ वर्षांच्या अनुभवधारकास विशेष प्राधान्य. |
| | | | प्रतिनियुक्ती १००% | . . | शासनाकडील उप संचालक (नगररचना) संवर्गातून प्रतिनियुक्ती. |
| ६४ | शहर विकास सेवा श्रेणी-१ | सहायक संचालक नगररचना | नामनिर्देशन | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी (बी.ई. सिव्हील)<br>(ब) राज्य/केंद्र शासनाकडील नगररचना विषयाचा मान्यताप्राप्त अभ्यासक्रम पूर्ण.<br>(क) उपरोक्त शाखेतील पदवी आणि/किंवा सहायक नगररचनाकार या पदावर किमान ५ वर्षांच्या अनुभवधारकास प्राधान्य. |
| | | | प्रतिनियुक्ती १००% | . . | शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सहायक संचालक नगररचना या सवंर्गातून प्रतिनियुक्तीने. |
| ६५ | शहर विकास सेवा श्रेणी-२ | सहायक नगररचनाकार | प्रतिनियुक्ती १००% | . . | शासनाकडील सहायक नगररचनाकार संवर्गातील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्ती. |
| ६६ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | आरेखक (ड्राफ्टस्मन)/ आर्किटेक्चरल असिस्टंट.[ड्राफ्टस्मन (सिव्हील)] | नामनिर्देशन ५०% | ३३ वर्षे | (अ) राज्य माध्यमिक / उच्च माध्यमिक शालांत शिक्षण मंडळाची परीक्षा उत्तीर्ण<br>(ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा आरेखक/ आर्किटेक्चरल ड्राफ्टस्मन/अनुरेखक किंवा तत्सम समतुल्य अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| | | | पदोन्नती ५०% | . . | नामनिर्देशनासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या सहायक आरेखक या पदावरील किमान ३ वर्षांचा अनुभव. |
| ६७ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | अनुरेखक (ट्रेसर) | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) राज्य माध्यमिक/उच्च माध्यमिक शालांत शिक्षण मंडळाची परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा अनुरेखक व तत्सम समतुल्य अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| ६८ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-१ | उप अभियंता (विद्युत) | नामनिर्देशन/पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी अथवा तत्सम समकक्ष शाखेची पदवी.<br>(ब) पदव्युत्तर पदवी आणि/अथवा समकक्ष पदावरील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | . . | महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कार्यरत शाखा अभियंता या संवर्गात किमान ५ वर्षांचा अनुभव अथवा कनिष्ठ अभियंता या संवर्गात किमान ८ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ६९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-२ | शाखा अभियंता (विद्युत) | नामनिर्देशन ५०% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची अथवा समतुल्य शाखेची पदवी/पदविका. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | (ब) पदव्युत्तर पदवी अथवा समतुल्य पदावरील कामाच्या अनुभवधारकांस प्राधान्य. |
| | | | पदोन्नती ५०% | . . | महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे कार्यरत विद्युत पर्यवेक्षक पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ७० | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | इलेक्ट्रीक सुपरवाईझर/ विद्युत पर्यवेक्षक | नामनिर्देशन ५०% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा विद्युत अभियांत्रिकी शाखेची अथवा समतुल्य शाखेची पदवी/ पदविका (बी.ई.इलेक्ट्रीक किंवा डी.ई.ई.)<br>(ब) पदव्युत्तर पदवी आणि अथवा समतुल्य पदावरील कामाच्या अनुभवधारकास प्राधान्य. MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र आवश्यक. |
| | | | पदोन्नती ५०% | . . | महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे वीजतंत्री या पदावर किमान ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक |
| ७१ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | वीजतंत्री (वीजतंत्री/इलेक्ट्रीक टेक्निशियन्) | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे वीजतंत्री अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| ७२ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | वायरमन/तारतंत्री | नामनिर्देशन ७५% | ३३ वर्षे | (अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| | | | पदोन्नती २५% | . . | नामनिर्देशनामध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कामाचा ३ वर्षांचा अनुभव. |
| ७३ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-२ | शाखा अभियंता (ऑटोमोबाईल) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/ऑटोमोबाईल अभियांत्रिकी शाखेची अथवा समतुल्य शाखेची पदवी / पदविका.<br>(ब) पदव्युत्तर पदवी आणि अथवा समतुल्य पदावरील कामाच्या अनुभवधारकांस प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | . . | महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे कार्यरत कनिष्ठ अभियंता पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ७४ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल) | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी / ऑटोमोबाईल अभियांत्रिकी शाखेची पदविका<br>(ब) ३ वर्षांचा संबंधित कामाचा अनुभव किंवा<br>(क) यांत्रिकी/ऑटोमोबाईल अभियांत्रिकी शाखेतील पदवी. |
| ७५ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | प्रमुख मोटार मेकॅनिक (मेकॅनिक) | पदोन्नती १००% | . . | मोटार मेकॅनिक या संवर्गात ७ वर्षांच्या सेवेनंतर ज्येष्ठता व पात्रतेनुसार पदोन्नतीने. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ७६ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | मोटार मेकॅनिक | पदोन्नती १००% | . . | महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्त या आधारे कार्यरत सहा. मोटार मॅकेनिक या संवर्गात ७ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ७७ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | असि.मेकॅनिक | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे ॲटोमोबाईल - फिटर/यांत्रिकी- फिटर/ डिझेल मॅकेनिक/मोटार मॅकेनिक कोर्स आवश्यक. |
| ७८ | उद्यान सेवा श्रेणी-२ | वृक्ष संवर्धन व उद्यान अधिकारी (ॲग्री कम ट्री ऑफिसर) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० वर्षे | पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास सदर पद नामनिर्देशनाने भरण्यात यावे व त्यासाठी खालील अर्हता असावी—<br>(१) मान्यताप्राप्त कृषी विद्यापिठाची बी.एस.सी. (हॉर्टीकल्चर) ॲग्रीकल्चर/ बॉटनी/ फॉरेस्ट्री पदवी/ मान्यताप्राप्त विद्यापिठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>(२) शासकीय / निमशासकीय / स्था.स्व.संस्था तील किंवा समकक्ष पदावरील कामाचा ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे उप वृक्ष संवर्धन व उप उद्यान अधिकारी या संवर्गातून किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ७९ | उद्यान सेवा श्रेणी-३ | उप वृक्ष संवर्धन व उप उद्यान अधिकारी (गार्डन सुप्रीनटेंडेंट) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० वर्षे | पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास सदर पद नामनिर्देशनाने भरण्यांत यावे व त्यासाठी खालील अर्हता असावी—<br>(अ) मान्यताप्राप्त कृषी विद्यापिठाची बी.एस.सी. (हॉर्टीकल्चर) ॲग्रीकल्चर/ बॉटनी/ फॉरेस्ट्री पदवी/ मान्यताप्राप्त विद्यापिठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) शासकीय/ निमशासकीय/स्था.स्व.संस्था तील किंवा समकक्ष पदावरील कामाचा ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे सहायक वृक्ष संवर्धन व उद्यान अधिकारी या संवर्गात किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ८० | उद्यान सेवा श्रेणी-३ | सहायक वृक्ष संवर्धन व उद्यान अधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ४० वर्षे | पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास सदर पद नामनिर्देशनाने भरण्यांत यावे व त्यासाठी खालील अर्हता असावी— |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | (अ) मान्यता प्राप्त कृषी विद्यापीठाची बी.एस.सी. (हॉर्टिकल्चर्स) /ॲग्रीकल्चर्स/ बॉटनी / फॉरेस्ट्री पदवी / मान्यता प्राप्त विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) शासकीय /निमशासकीय/स्था.स्व.संस्थातील किंवा समकक्ष पदावरील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण केलेल्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे उद्यान सहाय्यक या संवर्गात किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ८१ | उद्यान सेवा श्रेणी-३ | उद्यान सहायक | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाची बी.एस.सी. (हॉर्टिकल्चर)/ ॲग्रीकल्चर/बॉटनी/फॉरेस्ट्री पदवी/मान्यता प्राप्त विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण. |
| ८२ | उद्यान सेवा श्रेणी-३ | मुख्य माळी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास) | ३३ वर्षे | (अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची शालान्त परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) माळी व्यवसायाचा १ वर्षांचा कृषी विद्यापीठाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम पूर्ण. |
| | | | पदोन्नती १००% | | (अ) इयत्ता ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे माळी या पदावर किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ८३ | उद्यान सेवा श्रेणी-४ | माळी | नामनिर्देशन | ३३ वर्षे | (अ) इयत्ता ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) बागकामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| ८४ | क्रीडा व सांस्कृतीक श्रेणी-३ | क्रीडा अधिकारी | नामनिर्देशन / पदोन्नतीकरिता अर्हताधारक उमेदवार उपलब्ध नसल्यास | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>(ब) बी.पी.एड्. (B.P.Ed.) ही पदवी.<br>(क) स्पोर्टस् ॲथॉरिटी ऑफ इंडियाकडील पदविका (SAI).<br>(ड) राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूस प्राधान्य देण्यात येईल.<br>(इ) शासकीय, निमशासकीय, सेवेतील क्रीडा क्षेत्रातील ३ वर्षांचा अनुभव. |
| | | | पदोन्नती १००% | . . | (अ) नामनिर्देशनासाठी विहित केलेली पात्रता.<br>(ब) महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे सहाय्यक क्रीडा अधिकारी पदाचा किमान ३ वर्षांचा अनुभव. |
| ८५ | क्रीडा व सांस्कृतीक श्रेणी-३ | सहाय्यक क्रीडा अधिकारी | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>(ब) बी.पी.एड. (B.P.Ed.) ही पदवी.<br>(क) स्पोर्टस् ॲथॉरिटी ऑफ इंडियाकडील पदविका (SAI).<br>(ड) राज्यस्तरावरील खेळाडूस प्राधान्य देण्यात येईल.<br>(इ) शासकीय, निमशासकीय, सेवेतील क्रीडा क्षेत्रातील ३ वर्षांचा अनुभव. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ८६ | तांत्रिक सेवा श्रेणी-२ | पर्यावरण संवर्धन अधिकारी | नामनिर्देशन १००% | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पर्यावरण अभियांत्रिकी विषयातील पदवी.<br>(ब) पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील किमान ५ वर्षांचा अनुभव.<br>(क) पर्यावरण अभियांत्रिकी शाखेची पदव्युत्तर पदवी आणि अथवा प्रदूषण नियंत्रण क्षेत्रातील अपवादात्मक अनुभव असणाऱ्या उमेदवारांस विशेष पसंती. |
| | | | पदोन्नती | . . | महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे प्रदूषण नियंत्रण अधिकारी संवर्गातील ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | . . | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने नेमणूक करता येईल. |
| ८७ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | प्रदूषण नियंत्रण अधिकारी | नामिनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पर्यावरण शास्त्र शाखेची पदवी.<br>(ब) पर्यावरण अभियांत्रिकी पदवीधारकांस प्राधान्य.<br>(क) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील अथवा समकक्ष आस्थापनेवरील समकक्ष पदाचा ५ वर्षांचा अनुभव असणाऱ्या उमेदावारांस प्राधान्य. |
| | | | पदोन्नती | . . | महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे नामनिर्देशनासाठी विहित अर्हता धारण करणाऱ्या प्रदूषण निरीक्षकास त्या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ८८ | आरोग्य सेवा श्रेणी-३ | पशुधन पर्यवेक्षक | नामनिर्देशन १००% | . . | शासनमान्य कृषी विद्यापिठाकडून घेण्यांत येणाऱ्या पशुवैद्य, पशुसंवर्धन विषयातील पदविका उत्तीर्ण किंवा तांत्रिक परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून घेण्यात येणाऱ्या दुग्धशाळा क्षेत्रव्यवस्थापनातील २ वर्षांचा पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण. . |
| ८९ | सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | चिफ सॅनिटरी इन्स्पेक्टर | नामनिर्देशन २५% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आणि आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेची 'स्वच्छता निरीक्षक' पदविका.<br>(ब) कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेमधील स्वच्छता निरीक्षक या संवर्गातील किमान ०५ वर्षांचा अनुभव.<br>(क) शास्त्र शाखेच्या पदवीधारकास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती ७५% | . . | अ.नगर महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे स्वच्छता निरीक्षक या संवर्गात किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| ९० | सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | स्वच्छता निरीक्षक (सॅनिटरी इन्स्पेक्टर, कंपोस्ट इन्स्पेक्टर, मलेरीया इन्स्पेक्टर) | नामनिर्देशन २५% | ३३ वर्षे | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वच्छता निरीक्षक पदविका.<br>(ब) कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेमधील उप स्वच्छता निरीक्षक या संवर्गातील किमान ५ वर्षांचा अनुभव. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | | | (क) शास्त्र शाखेची पदवी असल्यास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती ७५% | . . | महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे सॅनिटरी सब इन्स्पेक्टर संवर्गात किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ९१ | सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | सॅनिटरी सब इन्स्पेक्टर | नामनिर्देशन ७५% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वच्छता निरीक्षक पदविका आवश्यक.<br>(ब) शासन मान्य विद्यापिठाची पदवी विशेषतः शास्त्र शाखेची पदवी असल्यास प्राधान्य.<br>(क) स्वच्छता निरीक्षक म्हणून अनुभव असल्यास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती २५% | | (अ) किमान माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वच्छता निरीक्षक पदविका आवश्यक.<br>(ब) महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे उपरोक्त शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांतून पदोन्नती. |
| ९२ | सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी सेवा श्रेणी-४ | सफाई मुकादम, डेपो मुकादम ट्रॅपिंग मुकादम, सफाई मुकादम, मेहतर मुकादम) | पदोन्नती १००% | | इयत्ता ७ वी उत्तीर्ण व महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे सफाई कामगार पदाचा किमान ७ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ९३ | सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी सेवा श्रेणी-४ | सफाई कामगार (कारंजा क्लिनर/ नाईट साईल डेपो बिगारी/मैला डेपो बिगारी/कचरा मोटार बिगारी/लेबर कचरा मोटर बिगारी/ रिली. कचरा मोटार बिगारी/मलेरीया बिगारी/ ट्रॅपिंग बिगारी/ मार्केट बिगारी/सॅनि. वर्क्स बिगारी/ कोडवाडा वॉचमेन/ अंडरग्राउंड गटर बिगारी/टाररोड कामगार/रिलीव्हर कामगार सफाई/गटर कामगार/सफाई कामगार ८६/सफाई | नामनिर्देशन / लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार १००% | | (अ) इ.४ थी उत्तीर्ण.<br>(ब) मराठी लिहीता, वाचता, बोलता येणे आवश्यक. |

**परिशिष्ट २—चालू**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | कामगार १२९/खासगी पाय साफ करणारे/ रिलीव्हर स.का.मे.का/ रस्ता बाजू मे.का./ झाडु कामगार/ आरोग्य बिगारी.) | | | |
| ९४ | आरोग्य सेवा श्रेणी-१. | वैद्यकीय आरोग्य अधिकारी. | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास). | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यक शास्त्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी. M.D.(P.S.M.) परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) राज्य् / केंद्रशासन / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील सहाय्यक आरोग्य अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ७ वर्षांचा पर्यवेक्षकीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक.<br>(क) रुग्णालयातील प्रशासन, सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषतः स्वच्छता पर्यवेक्षण, साथ आजार निर्मूलन कार्यक्रम, हिवताप नियंत्रण आदी बाबींच्या कार्याचा किमान ७ वर्षांचा प्रत्यक्ष अनुभवधारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कार्यरत आरोग्य अधिकारी रुग्णालये /आरोग्य अधिकारी प्रतिबंधात्मक उपाय किंवा वैद्यकीय अधिकारी या संवर्गातील किमान ७ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| | | | प्रतिनियुक्ती | . . | नामनिर्देशन व पदोन्नतीसाठी योग्य अधिकारी उपलब्ध न झाल्यास नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या शासनाकडील योग्य अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने. |
| ९५ | आरोग्य सेवा श्रेणी-१. | वैद्यकीय अधीक्षक (आरोग्याधिकारी). | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास). | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यक शास्त्रातील पदव्युत्तर पदवी. [M.D. /M.S.(Clinical)]<br>(ब) रुग्णालय प्रशासन पदविका (D.H.A.) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य.<br>(क) राज्य/केंद्रशासन/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील किमान ३०० खाटांच्या रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ७ वर्षांचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या प्रभाग वैद्यकीय अधिकारी वा तत्सम या संवर्गातील किमान ५ वर्षांचा अनुभव. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रतिनियुक्ती | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभवधारण करणाऱ्या शासनाकडील योग्य अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने. |
| ९६ | आरोग्य सेवा श्रेणी-१. | आरोग्याधिकारी (प्रतिबंधात्मक उपाय/घनकचरा व्यवस्थापन (उप-आरोग्याधिकारी). | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास). | ४५ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यक शास्त्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी (M.D.(P.S.M.) परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) शासन/केंद्रशासन /निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील प्रभाग वैद्यकीय अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ५ वर्षांचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक.<br>(क) रुग्णालयातील प्रशासन, सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषतः स्वच्छता पर्यवेक्षण, साथआजार निर्मूलन कार्यक्रम हिवताप नियंत्रण आदि बाबींच्या कार्याचा ५ वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या प्रभाग वैद्यकीय अधिकारी वा तत्सम या संवर्गातील किमान ५ वर्षांचा अनुभव.<br>**टीप.**-सद्य स्थितीत उप-आरोग्याधिकारी पद भरलेले आहे. सदर पद रिक्त झाल्यानंतर ते प्रस्तावित अर्हतेनुसार भरण्यात यावे. |
| ९७ | आरोग्य सेवा श्रेणी-२. | वैद्यकीय अधिकारी | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम बी बी एस / बी ए एम एस (आयुर्वेद)/ बी एच एम एस (होमिओपॅथी) किंवा शासनमान्य समकक्ष पदवी.<br>(ब) शासकीय/ निमशासकीय/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षांचा अनुभव<br>(क) महाराष्ट्र मेडीकल कौन्सील अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक. |
| ९८ | आरोग्य सेवा श्रेणी-१. | रक्तसंक्रमण अधिकारी (बी.टी.ओ.). | नामनिर्देशन १००% | ३५ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी.(शरीर विकृतीशास्त्र) किंवा एम.बी.बी.एस. व शरीर विकृती शास्त्र मधील पदविका किंवा समकक्ष पदवी.<br>(ब) शासकीय / निमशासकीय / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षांचा अनुभव. |
| ९९ | आरोग्य सेवा श्रेणी-१. | शहर क्षयरोग अधिकारी. | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास). | ४० वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यक शास्त्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी [M.D. (P.S.M)] परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) राज्य/केंद्रशासन/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील प्रभाग वैद्यकीय अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ३ वर्षांचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | (क) रुग्णालयातील प्रशासन, सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषतः स्वच्छता पर्यवेक्षण, साथ आजार निर्मुलन कार्यक्रम, हिवताप नियंत्रण आदी बाबींच्या कार्याचा किमान ५ वर्षांचा प्रत्यक्ष अनुभवधारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कार्यरत वैद्यकीय अधिकारी/अपघात वैद्यकीय अधिकारी/ वैद्यकीय तज्ञ या संवर्गातील किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| १०० | आरोग्य सेवा श्रेणी-१. | स्त्रीरोग तज्ञ | नामनिर्देशन १००% | ३५ वर्षे | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम. डी. (स्त्री व प्रसूतीरोगशास्त्र) किंवा एम.बी.बी.एस., डी.जी.ओ. किंवा समकक्ष पदवी.<br>(ब) शासकीय/ निमशासकीय/ खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षांचा अनुभव. |
| १०१ | आरोग्य सेवा श्रेणी-१. | बालरोगतज्ञ | नामनिर्देशन १००% | ३५ वर्षे | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम्. डी., डी.सी.एच./ एम.डी. (बालरोग चिकित्सा शास्त्र) किंवा समकक्ष पदवी.<br>(ब) शासकीय/ निमशासकीय/ खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षांचा अनुभव. |
| १०२ | आरोग्य सेवा श्रेणी-१. | बधिरीकरण तज्ञ | नामनिर्देशन १००% | ३५ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम. डी. (ऑनास्थेशिया) किंवा एम.बी.बी.एस. पदवी आणि डी.ए. (डिप्लोमा इन ॲनास्थेशीया) किंवा समकक्ष पदवी.<br>(ब) शासकीय / निमशासकीय / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षांचा अनुभव. |
| १०३ | आरोग्य सेवा श्रेणी-३. | एक्सरे टेक्नीशियन | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध नसल्यास). | ३३ | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची भौतिकशास्त्र या विषयासह विज्ञान शाखेची पदवी.<br>(ब) शासन मान्यता प्राप्त संस्थेतून 'क्ष-किरण तंत्रज्ञ' या विषयाचे प्रशिक्षण पूर्ण.<br>(क) वैद्यकीय प्रयोगशाळेतील किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | | महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे क्ष-किरण सहाय्यक पदावरील किमान ३ वर्षांचा अनुभव. |
| १०४ | आरोग्य सेवा श्रेणी-३. | लॅब टेक्नीशियन | नामनिर्देशन ७५% | ३३ | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची रसायन शास्त्र, जीवशास्त्र वा सुक्ष्मजीव शास्त्र या विषयातील पदवी.<br>(ब) मान्यता प्राप्त संस्थेची डी एम एल टी परीक्षा उत्तीर्ण<br>(क) वैद्यकीय प्रयोगशाळेतील किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती २५% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे महापालिकेच्या आस्थापनेवरील प्रयोगशाळा सहायक/ |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | रक्तपेढी सहाय्यक या संवर्गातील कामाचा किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| १०५ | तांत्रिक सेवा श्रेणी-३. | लॅब असिस्टंट | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण<br>(ब) मान्यताप्राप्त संस्थेची D.M.L.T. पदविका.<br>(क) शास्त्र शाखेचा पदवीधर आणि डी.एम.एल.टी. पदविका धारकास प्राधान्य. |
| १०६ | आरोग्य सेवा श्रेणी-३. | कंपौंडर (मिश्रक) (कंपौंडर /कंपौंडर कम क्लार्क). | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (विज्ञान शाखा) उत्तीर्ण.<br>(ब) औषध निर्माण शास्त्रातील पदविका (डी. फॉर्म.)<br>(क) औषध निर्माण शास्त्रातील पदवीधर उमेदवारास प्राधान्य<br>(ड) संबंधित कामाचा ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| १०७ | आरोग्य सेवा श्रेणी-३. | अन्ननिरीक्षक | नामनिर्देशन ५०% | ३३ वर्षे | (अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची औषध निर्माण शास्त्राची पदवी किंवा रसायन शास्त्र विषयाची पदव्युत्तर पदवी आणि शासनाचा अन्न निरीक्षक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर किमान ३ वर्षांचा संबंधित कामाचा अनुभव. |
| | | | पदोन्नती ५०% | | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील कनिष्ठस्तर परीक्षा उत्तीर्ण सॅनिटरी सब इंस्पेक्टर संवर्गातील ५ वर्षे सेवा. |
| १०८ | आरोग्य सेवा श्रेणी-३. | सांख्यिकी अधिकारी | नामनिर्देशन/पदोन्नतीने उमेदवार उपलब्ध न झाल्यास. | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची सांख्यिकी विषयासह पदवी.<br>(ब) सांख्यिकी मधील पदव्युत्तर पदवीधरास आणि तत्सम पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती १००% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे सांख्यिकी सहाय्यक या संवर्गात किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| १०९ | आरोग्य सेवा श्रेणी-३. | सांख्यिकी सहाय्यक | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची सांख्यिकी विषयासह पदवी.<br>(ब) सांख्यिकी मधील पदव्युत्तर पदवीधरास आणि तत्सम पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| ११० | निम वैद्यकीय सेवा श्रेणी-३. | मेट्रन | नामनिर्देशन/पदोन्नतीने उमेदवार उपलब्ध न झाल्यास. | ३३ वर्षे | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस.सी (नर्सिंग) या विषयाची पदवी.<br>(ब) पदव्युत्तर पदवी उमेदवारास प्राधान्य.<br>(क) सहाय्यक अधिसेविका या पदावरील शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था मान्यवर रुग्णालयातील ७ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक.<br>(ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | . . | महापालिकेच्या आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे सहाय्यक अधिसेविका पब्लिक हेल्थ नर्स किंवा नर्स (परीचारीका) संवर्गातील किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. |

**परिशिष्ट २**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १११ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी-३. | नर्स /परीचारीका | नामनिर्देशन ७५% | ३३ | (अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी विज्ञान शाखेची परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका.<br>(क) शासकीय / निमशासकीय खासगी रुग्णालयातील परिचारीका म्हणून ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>(ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची नोंदणी आवश्यक |
| | | | पदोन्नती २५% | . . | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिकेच्या आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे प्रसविका किंवा मिडवाईफ/नर्स (ए.एन.एम.) व तत्सम संवर्गातील कामाचा किमान ३ वर्षांचा अनुभव. |
| ११२ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी-३. | नर्स (ए.एन.एम.) [मिडवाईऱ/नर्स (ए.एन.एम.)] | नामनिर्देशन १००% | ३३ | (अ) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) शासन मान्यता प्राप्त संस्थेचा ए.एन.एम. अभ्यासक्रम पूर्ण व त्यानंतर कामाचा २ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>(क) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची नोंदणी आवश्यक. |
| ११३ | आरोग्य सेवा श्रेणी-४. | दाया | | | (अ) इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) मराठी लिहता, वाचता व बोलता येणे आवश्यक. |
| ११४ | आरोग्य सेवा श्रेणी-४. | आया | | | (अ) इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) मराठी लिहता, वाचता व बोलता येणे आवश्यक. |
| ११५ | आरोग्य सेवा श्रेणी-४. | वॉर्डबॉय | नामनिर्देशन १००% | ३३ वर्षे | (अ) इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण.<br>(ब) शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था/ मान्यवर ट्रस्ट यांचे रुग्णालयातील कामाचा ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>(क) मराठी लिहता, वाचता व बोलता येणे आवश्यक. |
| ११६ | अग्निशमन सेवा श्रेणी-१. | मुख्य अग्निशामन अधिकारी. | नामनिर्देशन | | |
| | | | पदोन्नती | | संचालक, अग्निशमन संचालनालयाकडून विहित करण्यात येणारी अर्हता लागू राहील. |
| ११७ | अग्निशमन सेवा श्रेणी-२. | उपमुख्य अग्निशामन अधिकारी. | नामनिर्देशन | | |
| | | | पदोन्नती | | |
| ११८ | अग्निशमन सेवा श्रेणी-३. | स्थानक अधिकारी (स्टेशन ऑरीसर). | नामनिर्देशन | | |
| | | | पदोन्नती | | |
| ११९ | अग्निशमन सेवा श्रेणी-३. | सब ऑफीसर (फायर फायटर सुप्रिडेंट). | नामनिर्देशन | | संचालक, अग्निशमन संचालनालयाकडून विहित करण्यात येणारी अर्हता लागू राहील. |
| | | | पदोन्नती | | |
| १२० | अग्निशमन सेवा श्रेणी-३. | लिडींग फायरमन (फायर फायटर सुपरवायझर) | नामनिर्देशन | | |
| | | | पदोन्नती | | |

**परिशिष्ट २**—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १२१ | अग्निशमन सेवा श्रेणी-३. | ड्रायव्हर ऑपरेटर (फायर फायटर ड्रायव्हर). | नामनिर्देशन | | |
| | | | पदोन्नती | | |
| १२२ | अग्निशमन सेवा श्रेणी-३. | फायरमन | नामनिर्देशन | | |
| | | | पदोन्नती | | |
| १२३ | अग्निशमन सेवा श्रेणी-४ . | फायरमन मदतनीस (फायर फायटर बिगारी). | नामनिर्देशन | | |
| | | | पदोन्नती | | |

**अहमदनगर महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा नियम, २०१६**

**परिशिष्ट ३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम ४६५ पोट-कलम (१) खंड (ल)च्या तरतुदींनुसार महानगरपालिकांसाठी केलेले नियम

**नियम**

१. **संक्षिप्त शीर्षक व नियम लागू होण्याचा दिनांक :** (अ) या नियमास अहमदनगर महानगरपालिकेसाठी (अर्हताकारी विभागीय परीक्षा) नियम, २०१६ संबोधण्यात येईल.

(ब) सदर नियम **शासन राजपत्रात** प्रसिद्ध होतील त्या तारखेपासून अंमलात येतील.

२. **व्याख्या :** (१) विषयांत किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास या नियमानुसार

(अ) " अधिनियम " म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा मुंबई ५९)

(ब) " आयुक्त " म्हणजे अधिनियमाच्या कलम ३६ प्रमाणे नियुक्त करण्यात आलेला प्राधिकारी व यात अधिनियमाच्या कलम ३९ प्रमाणे नेमणूक करण्यात आलेला हंगामी आयुक्त वा या नियमांच्या तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी अधिनियमाच्या कलम ६९ प्रमाणे अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो.

(क) " कर्मचारी " म्हणजे अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६ अन्वये नियुक्त कर्मचारी, मात्र प्रतिनियुक्तीने नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत हे नियम लागू असणार नाहीत.

(ड) " महानगरपालिका " म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार निर्माण केलेली अहमदनगर महानगरपालिका.

(इ) " विभागीय परीक्षा " म्हणजे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी घेण्यात येणारी व या नियमांच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद करण्यात आलेली विभागीय परीक्षा.

(ई) " परिशिष्ट " म्हणजे या नियमांचे परिशिष्ट.

(२) ज्या शब्दांची वा शब्दसमुहांची व्याख्या या नियमांत समाविष्ट करण्यात आली नसेल त्यांचा अर्थ अधिनियमात ते ज्या अर्थाने वापरले असतील तसा समजण्यात येईल.

३. **विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य :** (अ) हे नियम अस्तित्वात आल्याच्या तारखेस महानगरपालिकेच्या आस्थापनेवर स्थायी/अस्थायी स्वरूपात कोणत्याही पदावर नियुक्त असलेल्या व त्या तारखेनंतर नियुक्त होणाऱ्या परिशिष्ट-३ मध्ये नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना परिशिष्ट-३ च्या ब-१ व ब-२ मध्ये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

(ब) उपरोक्त परिशिष्ट-अ मध्ये ज्या संवर्गाचा उल्लेख आलेला नसेल त्या संवर्गातील आयुक्ताच्या मान्यतेने अधिकाऱ्यांच्या / कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानाची चाचणी घेण्यासाठी लेखी अथवा लेखी व तोंडी परीक्षा विहित केली जाईल. याकरिता किमान तीस दिवसांपेक्षा कमी नाही एवढ्या कालावधीची पुर्वसुचना संबंधितांस देण्यात येईल.

४. **कालावधी आणि संधीची संख्या :** (अ) **राजपत्राच्या** दिनांकापूर्वी नियुक्त केलेल्या व्यक्तीकरिता कालावधी व संधीची संख्या या नियमांच्या अधिन राहून, **राजपत्राच्या** दिनांकापूर्वी महानगरपालिका कर्मचारी म्हणून नियुक्त झालेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या व्यक्तीने, तिला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधुन नियम १० अन्वये सूट दिलेली नसेल तर **राजपत्राच्या** दिनांकापासून ३ वर्षांच्या आत व २ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(ब) अहमदनगर महानगरपालिका सेवाभरती नियम, २०१६ नुसार नियुक्त कर्मचाऱ्यांनी त्यांची नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षांत ३ संधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

५. **परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मानक :** (अ) महानगरपालिकेतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रश्नपत्रिकेच्या एकूण गुणांच्या किमान ४५% गुण मिळवणे आवश्यक असेल.

(ब) परंतु चतुर्थ संवर्गातील जे कर्मचारी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असतील त्यांना लिपिक या पदावर पदोन्नती मिळण्यासाठी परिशिष्ट ब-१ च्या केवळ प्रश्नपत्रिका १ ची परीक्षा द्यावी लागेल. या कर्मचाऱ्यांना ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी ४०% गुण आवश्यक असतील.

(क) प्रत्येक संवर्गातील विहित करण्यात आलेल्या सर्व विषयांत वरील (अ) व (ब) च्या तरतुदींच्या आधारे एक वा एकापेक्षा अधिक संधीत उत्तीर्ण झाल्यावरच विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे समजण्यात येईल.

६. **अनुग्रह गुण :** संपूर्ण परीक्षेसाठी विहित केलेल्या गुणांच्या ४५% किंवा त्याहून अधिक गुण एखाद्या उमेदवाराने मिळवले असतील परंतु एक किंवा दोन स्वतंत्र प्रश्नपत्रिकामध्ये ४५% गुण तो मिळवू शकत नसेल तर त्याला विषयांमध्ये अथवा एकूण परीक्षेत जास्तीत जास्त ४ अनुग्रह गुण जर ज्यामुळे तो परीक्षा उत्तीर्ण होत असेल तर देण्यात येतील. ज्या उमेदवारांना यापूर्वीच्या प्रयत्नांमध्ये सूट देण्यात आलेली आहे. त्यांना सुद्धा ही सवलत देण्यात येईल.

७. **परीक्षेचा अभ्यासक्रम :** विभागीय परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम परिशिष्ट ३-ब-१/३-ब-२ मध्ये विहित केल्याप्रमाणे किंवा शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार असेल.

परंतु, अग्निशमन विभागातील उपस्थानक अधिकारी व त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठीच्या नागपूर अग्निशमन महाविद्यालयाकडून घेतल्या जाणाऱ्या व अभियांत्रिकी अधिकारी, महाविद्यालय, नाशिक यांचेकडून अभियांत्रिकी विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी विहित केलेल्या परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम त्या परीक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडून जाहीर केल्याप्रमाणे असेल.

८. **प्रशिक्षण :** विभागीय परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी परीक्षेपूर्वी किमान ४० तासांचा प्रशिक्षण कार्यक्रम महानगरपालिकेकडून आयोजित करण्यात येईल.

९. **परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम :** एखादा कर्मचारी नियम-४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत आणि संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर पुढील परिणाम होतील :—

(अ) तो परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा नियम-१० च्या पोट-नियम (१) व (२) अन्वये परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यास सूट मिळेपर्यंत त्याला त्याच्या पदावर कायम करण्यात येणार नाही. किंवा त्याच्या पदाच्या वेतनमानातील पुढील वेतनवाढ त्याला देण्यात येणार नाही. अशा रितीने रोखून ठेवलेली वेतनवाढ तो परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून किंवा त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम-१० च्या पोट-नियम (१) व (२) अन्वये सूट देण्यात आल्याच्या दिनांकापासून त्याला देय असेल आणि कोणतीही वेतनवाढ रोखून न धरल्याचे समजून पुढील सर्व वेतनवाढी देण्यात येतील. मात्र गतकाळातील थकबाकीची रक्कम अनुज्ञेय नसेल.

(ब) त्याला त्या संवर्गातील आपली ज्येष्ठता गमवावी लागेल म्हणजेच जे कर्मचारी त्याच्या अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाले असतील त्या सर्व कर्मचाऱ्यांच्या नंतर त्यांचा ज्येष्ठता क्रम लागेल. तसेच, अशा ज्या कर्मचाऱ्यांच्या नंतर त्यांचा ज्येष्ठता क्रम लागेल त्या कर्मचाऱ्यास ज्येष्ठ असणाऱ्या आणि त्याच्या नंतर परंतु नियम-४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नंतरचा ज्येष्ठताक्रम त्याला देण्यात येईल.

१०. **परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट :** (१) **राजपत्राच्या** दिनांकानंतर नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांस परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून पुढील बाबतीत सूट देण्यात येईल :—

(अ) त्यास यापूर्वीच कर्मचारी म्हणून कायम करण्यात आले असेल अशा प्रकरणी किंवा

(ब) तो सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये यापूर्वीच परीक्षा उत्तीर्ण झाला असेल अशा प्रकरणी किंवा

(२) कोणत्याही दिनांकास कर्मचारी ४५ वर्षे वयाचा झाल्यानंतर त्यास परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.

११. परीक्षा सर्वसाधारणपणे वर्षातून एकदा घेण्यात येईल. एखाद्या वर्षी जर कोणत्याही कारणास्तव परीक्षा घेण्यात आली नाही तर कालावधी व संधीची गणना करताना वगळण्यात येईल.

१२. **निर्वाचनाच्या शक्ती :** या नियमातील तरतुदींनुसार अधिकाऱ्यांच्या / कर्मचाऱ्यांच्या एखाद्या संवर्गास कोणती विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे वा कोणत्या संवर्गास ही परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट आहे यासंबंधी कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास त्याबाबतचा आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल.

## परिशिष्ट ३अ

(नियम-३)

विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग

| अ.क्र. | विभाग | संवर्ग |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय सेवा | लिपिक / वरिष्ठ लिपिक / सहायक अधिक्षक, सांख्यिकी सहायक/अधिक्षक प्रभाग अधिकारी, प्रशासन अधिकारी शि.म., महिला व बाल कल्याण अधिकारी, माहिती व जनसंपर्क अधिकारी, नगरसचिव, सहा.आयुक्त / उपायुक्त.<br>लिपिक संवर्गात येणारी पदे<br>लिपिक-टंकलेखक / माहिती नोंदणीकार / लिपिक / लेखा लिपिक / दुरध्वनी चालक / रात्रपाळी सुपरवायझर. |
| २ | लेखा/लेखा परिक्षण सेवा | लिपिक/वरिष्ठ लिपिक /रोखपाल/सहायक लेखाधिकारी/ लेखाधिकारी, लेखापरीक्षक, सहायक मुख्य लेखापरीक्षक, उप मुख्य लेखाधिकारी, उप मुख्य लेखापरीक्षक/ मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखाधिकारी, |

परिशिष्ट ब-२ मध्ये विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग

| अ.क्र. | विभाग | संवर्ग |
|---|---|---|
| १ | अग्निशमन | अग्निशामक / ड्रायव्हर ऑपरेटर |

महानगरपालिकेव्यतिरिक्त इतर प्राधिकाऱ्याकडून घेतल्या जाणाऱ्या विहित विभागीय परीक्षा.

| अ.क्र. | विभाग | परीक्षा घेणारा प्राधिकारी | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | अग्निशमन | अग्निशमन महाविद्यालय, नागपूर | अग्निशमन पर्यवेक्षक/ स्थानक अधिकारी / उप अग्निशमन अधिकारी/ मुख्य अग्निशमन अधिकारी (विभागीय परीक्षा अधिकारी) |
| २ | अभियांत्रिकी स्थापत्य/ विद्युत /यांत्रिकी | अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक | सहायक कनिष्ठ अभियंता /इमारत निरिक्षक/ इमारत पर्यवेक्षक/कनिष्ठ अभियंता/उप अभियंता/ शहर अभियंता |

## परिशिष्ट-३-ब-१

(नियम -३)

विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग

**प्रश्नपत्रिका-१** (गुण १००, वेळ ३ तास)

१. सारांश लेखन

२. टिपणी लेखन

३. पत्र लेखन

४.भाषांतर (इंग्रजीतून मराठीत)

**टीप :** या प्रश्नपत्रिकेचे माध्यम मराठी असेल व प्रश्नांची उत्तरे मराठी भाषेत द्यावी लागतील.

**प्रश्नपत्रिका-२** (पुस्तकासह) (गुण १००, वेळ ३ तास)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट ४ व अनुसूची-ड ची प्रकरणे १ ते १९ व विशेष महाराष्ट्र महानगरपालिका नियमाच्या तरतुदीनुसार असलेले प्राधिकारी यांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व कामकाजाची पद्धती.

**प्रश्नपत्रिका-३** (पुस्तकासह) (गुण १००, वेळ ३ तास)

(१) सेवेच्या सर्वसाधारण शर्ती : (७५ गुण)

(सर्व महाराष्ट्र नागरी सेवा नियम )

रजा

वेतन

वर्तणूक आणि शिस्त व अपील

निवृत्तीवेतन नियम

(२) रचना व कार्यपद्धती : (२५ गुण)

सहा गठ्ठे पद्धती

लिपिक वा तत्सम संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांना (गट-क) लेखा/ लेखापरिक्षण सेवा विभागात कार्य करण्याची इच्छा असेल त्यांना प्रश्नपत्रिका १, २, ३ व्यतिरिक्त पुढे विहित करण्यात आलेल्या विषयांच्या परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागेल.

**प्रश्नपत्रिका-४** (पुस्तकासह) (गुण १००, वेळ ३ तास)

१. मुंबई वित्तीय नियम, १९५९.

२. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका प्रकरण क्र.४,५,७,९ व १७ अभ्यासात नाही, परिशिष्टे २,४,८ व ११ वगळून.

३. महाराष्ट्र सार्वजनिक खर्च नियमावली, १९६५ तसेच नियमावली, १९९२.

४. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली, २,३,६,७,८,९,१०,११,१२-१ ते १२-५ इतकी प्रकरणे अभ्यासक्रमात आहेत.

५. महानगरपालिकेच्या निविदेसाठीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती.

**प्रश्नपत्रिका -५** (पुस्तकासह) (गुण १००, वेळ ३ तास)

१. Book Keeping and Accountancy

२. Accrual Based Double Entry Accounting

३. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७

४. मुंबई प्राथमिक शिक्षण नियम, १९४९.

गट क च्या कर्मचाऱ्यांना गट-ब च्या पदावर पदोन्नती मिळण्यापूर्वी या परिशिष्टातील प्रश्नपत्रिका क्र.१, २ व ३ व्यतिरिक्त खालील प्रश्नपत्रिकेत उत्तीर्ण होणे आवश्यक असेल :—

**प्रश्नपत्रिका-६** (पुस्तकासह) (गुण १००, वेळ ३ तास)

१. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६

२. महानगरपालिका (घनकचरा व्यवस्थापन) उपविधी, २००२

३. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्षांचे जतन, अधिनियम, १९७५

४. सुवर्ण जयंती रोजगार योजना

५. झोपडपट्टी सुधार समिती

६. अंध व अपंगासाठीच्या शासनाच्या सवलती व योजना

७. समाज विकास व बालकल्याण संबंधीच्या शासनाच्या व महानगरपालिकेच्या योजना

**परिशिष्ट ३-ब-२**

विभागीय परीक्षा (अग्निशमन)

विभाग-अग्निशमन

संवर्ग - अग्निशमन / ड्रायव्हर ऑपरेटर

**तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा :** (१०० गुण)

(१) रासायनिक अग्निशामके : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा

(२) शिड्या : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा

(३) होज पाईप : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा

(४) फोम व होम साधने : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा

(५) हायट्रंट व होज फिटींग्ज : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा

(६) पंप : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा

(७) वॉटर रिले : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा

(८) गाठी : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा

(९) श्वसन उपकरणे : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा

(१०) कवायत : प्रकार, उपयोग, देखभाल व निगा

**लेखी परीक्षा :** (१०० गुण, वेळ २ तास)

(१) **प्रथमोपचार :** प्रथमोपचार पेटीतील साहित्य व भाजणे, अस्थिभंग, घुसमटणे, रक्तस्त्राव, जखमा यांचेवर करावयाच्या प्रथमोपचाराची माहिती देणे.

(२) **वॉचरुम कार्यपद्धती :** वॉचरुममध्ये ठेवल्या जाणाऱ्या रेकॉर्डची माहिती, त्यासाठी वापरली जाणारी कार्यपद्धती नमुने व काल्पनिक संदेशावर वॉचरुमच्या रेकॉर्डमध्ये नोंद करणे.

(३) **अग्निशामक व ड्रायव्हर :** पदाच्या कर्तव्याची माहिती असणे व ती कर्तव्य पार पाडण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामाबद्दलचा तपशील ड्रायव्हर ऑपरेटर पदाची कर्तव्य.

(४) **शिस्त व कर्तव्यपालन :** शिस्तीचे व कर्तव्यपालनाचे अग्निशमन विभागातील महत्त्व व त्यांचे पालन न झाल्यास होणारे परिणाम, कर्तव्यपालन न झाल्यामुळे वा झाल्यामुळे आठवणीत राहिलेल्या एखाद्या प्रसंगाचे वर्णन.

**परिशिष्ट ४**

**पदोन्नतीसाठी एकीकृत संवर्ग**

**प्रस्तावना :** महानगरपालिकेच्या कामाची व्याप्ती विचारात घेऊन वेळोवेळी विविध संवर्ग निर्माण करण्यात आलेले आहेत. मात्र या सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात व त्यांची सेवा ज्येष्ठता निश्चित करण्याकरिता प्रशासकीय कामाच्या सोईसाठी खालीलप्रमाणे एकीकृत संवर्ग निर्माण करण्यात येत आहे.

| अ.क्र. | निर्माण करण्यात येणाऱ्या एकीकृत संवर्गाचे नाव | समकक्ष पदे | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | सहायक आयुक्त | प्रभाग अधिकारी/प्रशासन अधिकारी/नगरसचिव | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| २ | अधीक्षक | वसुली अधीक्षक /संकीर्ण कर वसुली अधीक्षक/ मुख्य लिपिक/ अधीक्षक. | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| ३ | वरिष्ठ लिपिक (अ) | जकात अधीक्षक/ आस्थापना पर्यवेक्षक/ महासभा लिपिक / सि.जकात निरीक्षक/ जकात निरीक्षक / अतिक्रमण निरीक्षक / व.लिपिक (अ). | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४ | वरिष्ठ लिपिक (ब) | आस्थापना लिपिक/ पेन्शन लिपिक/ भांडारपाल/ समिती लिपिक/ कोऑडीनेटर/ सोशल वर्कर/ चेकर/ भरणा लिपिक/ व. लिपिक (ब)/ बाजार निरीक्षक. | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| ५ | लिपिक | लिपिक टंकलेखक/ टेलिफोन ऑपरेटर | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| ६ | शिपाई | शिपाई/वॉचमन/कक्षसेवक/कक्षसेविका/ व्हॉलमॅन/माळी/मजुर/क्लिनर/कामगार/इतर. | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| ७ | लेखाधिकारी | लेखापरीक्षक | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| ८ | उप लेखापाल | उप लेखापरीक्षक,रोखपाल | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| ९ | कनिष्ठ अभियंता | सर्व्हेअर | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| १० | वैद्यकीय अधिकारी | आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, वैद्यकशास्त्र तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, विकृतशास्त्र तज्ज्ञ. | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| ११ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ/ रक्तपेढी तंत्रज्ञ | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| १२ | प्रयोगशाळा सहायक | प्रयोगशाळा सहायक / रक्तपेढी सहायक | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| १३ | कक्षसेवक | कक्षसेवक /कक्षसेविका | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |
| १४ | सिस्टर इनचार्ज | सिस्टर इनचार्ज/ नाईट सुपरवायझर/ सार्वजनिक आरोग्य परिचारिका. | या पदाची कर्तव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे असतील. |

१. या एकिकृत संवर्गातील पदधारक बदलीसाठी आंतरपरिवर्तनीय असतील.

२. **समावेशन.—**जे कर्मचारी नियमितपणे पद धारण करीत असतील व संबंधित पदाच्या भरतीवेळी वेळोवेळी प्रचलित असलेल्या सेवा प्रवेश नियमांच्या तरतुदीनुसार त्या पदावर नियुक्ती झालेली असेल तर संबंधित स्वीकृत संवर्गात त्याचे नियमित समावेश झाले आहे, असे मानले जाईल, म्हणजेच त्याने धारण केलेले पद ज्या एकीकृत संवर्गात समाविष्ट केले असेल त्या एकीकृत संवर्गात त्याचे समावेशन होईल.

३. **ज्येष्ठता.—**एकीकृत संवर्गाची ज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा ज्येष्ठता नियम, १९८९ प्रमाणे निश्चित करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. सुधाकर शिंदे,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.